**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

जा.क्र. अम / सका - ०७/ २०१६.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १४ / १२ / २०१६.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०७, गुरुवार दिनांक २२ / १२ /२०१६.**

प्रति,

मा.श्री. / श्रीमती............................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

महोदय,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **गुरुवार दिनांक २२ / १२ / २०१६ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह, अहमदनगर येथे** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावांची टिप्पणी

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक - ७ गुरुवार दिनांक २२ / १२ / २०१६ रोजी दुपारी १.०० वाजता होणा-या सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका.

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| ३४ | दुखवटयाचे प्रस्ताव |
| ३५ | अहमदनगर महानगरपालिकेच्या नालेगांव स.नं.४३/३ या ठिकाणी मनपाच्या जागेवर मा. केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (National Urban Livelihoods Mission) अंतर्गत शहरी बेघरांना निवारा बांधणेबाबत |
| ३६ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये केंद्र शासनाच्या पुर्नरचित गतीमान विद्युत विकास व सुधारणा कार्यक्रम योजना अंतर्गत अहमदनगर शहरातील गणपती विसर्जन मिरवणुक मार्गावरील केबल टाकणेकरीता रस्ते खोदाई करणेस परवानगी देणे बाबत.<br>संदर्भ :- अधीक्षक अभियंता, म.रा.वि.जा.क्र.२६९ दि.१४/०२/२०१२ व इतर १६संदर्भीय पत्र. |
| ३७ | घनकचरा व्यवस्थापन विभागास शहरातील कचरा संकलनासाठी व वाहतुकीकामी नवीन वाहने खरेदी करणेबाबत |
| ३८ | मौजे भिंगार स.अ नं. ३४३/१ पैकी जागेवरील मंजूर विकास आराखडयातील आ.क्र. १२४, प्राथमिक शाळा व क्रिडांगणचे आरक्षण रद्द करणेबाबत |
| ३९ | महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सन २०१६-२०१७ साठीचा प्रस्ताव मा.शासनाकडेस प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणे व प्रकल्प सल्लागार संस्था नेमणे बाबतचा प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयास्तव ठेवणे बाबत |
| ४० | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : १४/१२/२०१६

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ३४** **दिनांक : २२ / १२ /२०१६.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** दुखवटयाचे प्रस्ताव

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| १ | ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक धिरजमल भगवानदास कटारिया यांचे शुक्रवार दिनांक ०९/१२/२०१६ रोजी अहमदनगर येथे झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २ | दैनिक लोकसत्ता माजी उपसंपादक प्रदीप पांडुरंग राजगुरु यांचे शुक्रवार दिनांक ०९/१२/२०१६ रोजी अहमदनगर येथे झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३ | सारोळा कासार येथील सैनिक योगेश भास्कर धामणे यांचे रविवार दिनांक ११/१२/२०१६ रोजी जम्मू-काश्मीर येथे सीमा क्षेत्रात झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ४ | अहमदनगर येथील सामाजिक कार्यकर्ते केदारनाथ माधवराव दारुणकर यांचे रविवार दिनांक ११/१२/२०१६ रोजी काश्मीर येथे सीमा क्षेत्रात झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ५ | पुणे येथील सैनिक सौरभ फराटे यांचे रविवार दिनांक १६/१२/२०१६ रोजी जम्मू-काश्मीर येथे सीमा क्षेत्रात झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ६ | अहमदनगर शहापूरच्या विष्णूदत्त आश्रमाचे प्रमुख श्री दत्त दिगंबर महाराज यांचे मंगळवार दिनांक २०/१२/२०१६ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |

---*---

**ठराव :-**

दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ३५** **दिनांक : २२ / १२ /२०१६.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या नालेगांव स.नं.४३/३ या ठिकाणी मनपाच्या जागेवर मा. केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (National Urban Livelihoods Mission) अंतर्गत शहरी बेघरांना निवारा बांधणेबाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भः- मा.नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक एनयुएल-२०१४/प्र.क्र. १०४/नवि -३३ दिनांक २८/०८/२०१४

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सादर करण्यात येते की, मा.केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान (National Urban Livelihoods Mission) योजना राबविणे बाबत संदर्भीय शासन निर्णय निर्गमीत केला आहे. त्यानुसार शहरातील बेघर लोकांना निवारा बांधणे बाबत मा.शासनाकडेस सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणे आवश्यक आहे. याबाबत संदर्भीय शासन निर्णयामध्ये पृष्ठ क्रमांक २० मधील उपांग क्रमांक ६ मध्ये खालील प्रमाणे बाब नमुद करण्यात आलेली आहे.

निवारा ही मानवाची मुलभुत गरज असल्याने अत्यंतीक गरीब व्यक्तीला या उपांगांतर्गत मूलभूत सुविधा असलेल्या कायमस्वरुपी निवाऱ्याची व्यवस्था या उपांगाव्दारे उपलब्ध केली जाईल. प्रत्येक १ लक्ष लोकसंख्येसाठी ५० ते १०० बेघर व्यक्तींना आश्रय देण्याकरीता एक निवारा उपलब्ध केला जाईल. सन २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीच्या आधारे पहिल्या टप्प्यात ज्या शहरांची लोकसंख्या १ लाखापेक्षा जास्त आहे, त्या शहरांमध्ये हा उपांग राबविला जाईल.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे सदर अभियानांतर्गत एकुण प्रकल्प रक्कमेच्या १०० % अनुदान प्राप्त होणार असुन त्यापैकी केंद्र शासनाचा हिस्सा ७५ % व राज्य शासनाचा हिस्सा २५% इतका उपलब्ध होणार आहे. महानगरपालिकेने स्नेहालय या संस्थेमार्फत शहरातील विविध भागातुन सर्व्हेक्षण केले असता १११ बेघर लोक आढळुन आले आहेत. महानगरपालिकेच्या मालकीच्या नालेगांव स. नं. ४३/३ याठिकाणी बेघरांसाठी घरे या आरक्षीत जागेमध्ये बेघरांसाठी निवारा बांधणे बाबत प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

१) बेघरांसाठी निवारा
२) पाईप गटर
३) अंतर्गत कौंक्रीट रोड
४) कंपौंड वॉल

त्यानुसार एकुण ११२५.१२ चौ.मी. क्षेत्रफळाचे बांधकाम प्रस्तावीत करण्यात आले असुन त्यामध्ये प्रती लाभार्थीस ३ मीटर X १.६५ मीटर बांधकाम क्षेत्रफळ वास्तव्यासाठी देण्यात येणार आहे. एकुण इमारतीचे स्वरुप तळमजला अधिक दोन मजले असे असुन स्त्री व पुरुष असे दोन विभाग करण्यात येणार आहेत. प्रत्येक मजल्यावर चार सामुहीक शौचालय व चार बाथरुमची व्यवस्था करण्यात येणार आहे. एकुण प्रकल्पाची रक्कम रुपये १५७.०८ लक्ष इतकी आहे. सदरचा प्रस्ताव मा. महासभेची मान्यता घेवुन शासनाकडेस सादर करणे आवश्यक आहे.

तरी अहमदनगर महानगरपालिकेच्या नालेगांव स. नं. ४३/३ याठिकाणी म. न.पा.च्या जागेवर मा.केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान (National Urban Livelihoods Mission) अंतर्गत शहरी बेघरांना निवारा बांधणे बाबत प्रस्तावास मंजुरी मिळणेस्तव मा. महासभेकडे सादर करणे बाबत सविनय सादर.

यावर प्र.शहरअभियंता श्री.सोनटक्के यांचा अभिप्राय की, मनपाचे नालेगांव स.नं.४३/३ या जागेवर केंद्र शासन पुरस्कृत NULM अंतर्गत शहरी बेघरांना निवारा केंद्र उभारणी कामी प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून मा.शासनास सादर करणेचे असलेने सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करणेस मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक श्री.अनारसे यांचा अभिप्राय की, लेखा परीक्षण करण्यांत आले. लेखापरीक्षण अभिप्राय/ त्रुटी निरंक.

यावर उपायुक्त (कर) श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, यथाप्रस्तावित नूसार नमूद अ प्रमाणे राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियाना अंतर्गत नागरी बेघरांसाठी निवारा योजनेसाठीचा प्रस्ताव अ नूसार मा.महासभेच्या मान्यतेस्तव सादर करणेस हरकत नाही. मे. सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त श्री.विलास वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालानुसार NULM अंतर्गत शासन निर्णय नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई दिनांक २८/०८/२०१४ अन्वये उपांग क्रं.०६ प्रमाणे शहरी बेघरांना निवारा (Scheme of shelter for urban Homeless) अंतर्गत रक्कम रु.१५७.०८ लक्ष च्या प्रस्तावास मा.महासभेची मंजुरी घेवून शासनाकडे पाठविणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साहेब यांचा अभिप्राय की, कृपया नगररचना विभागाने जागेबाबत स्वयंस्पष्ट अभिप्राय नोंदवावेत.

यावर नगररचनाकार श्री.राम पाटील यांचा अभिप्राय की, प्रस्तावित प्रकल्प मौजे नालेगांव स.नं.४३/३ या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत असुन, मंजूर विकास योजनेत सदर जागा झोपडपट्टी वासियांचे पुनर्वसन (रहिवास विभाग) या कारणासाठी आरक्षीत आहे.

सदर जागेचे क्षेत्र ४५००.०० चौ.मी.विकास हक्क योजनेच्या माध्यमातुन स.क्र.३३७/१३ दि.२३/१/२०१३ रोजी म.न.पा.कडे हस्तांतरीत झालेले आहे. सदर जागेपैकी १२३१.०० चौ.मी. जागेत मा.केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत शहरातील बेघरांना निवारा बांधणे बाबत प्रस्ताव आहे. सदर प्रस्ताव विषयांकित जागेत अनुज्ञेय करता येईल.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर साहेब, यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

****

**चर्चा :-**

**मा.श्री.दिलीप सातपुते** :- विषय मंजूर करा. बेघरांसाठी घराचा प्रश्न आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे** :- संबंधित खाते प्रमुखांना मा.महापौर साहेब तुम्ही आदेश द्या.

**मा.श्री.सुवेंद्र गांधी** :- घरकुल वाटप केलेल्या ठिकाणी विद्युतीकरण केले नाही. त्यामुळे योजनेतील घरांसाठी विदयुती करणाचा समावेश करावा. घरकुल मिळाले पण लाईट नाही.

**प्रकल्प विभाग प्रमुख श्री. मेहेत्रे** :- काटवन खंडोबा व वारूळाचा मारूती येथील घरकुल योजनेकरिता महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी यांना मा.आ.श्री.संग्रामभैय्या जगताप, मा.महापौर सौ.सुरेखाताई कदम ,अतिरिक्त आयुक्त मा.श्री.विलास वालगुड यांनी पत्र दिले आहे.

**मा.श्री.सुवेंद्र गांधी** :- जो मोबदला लागणार आहे तो दयायाला तयार आहे. ठेकेदार डिपॉझिटची रक्कम भरायला तयार नाही. त्यामुळे विषय पेंडींग आहे. टॅक्स माफ केला. हा विषय मंजुर करण्यांत यावा. किती टॅक्स लागणार आहे याचा उल्लेख करा.

**मा.श्री.विजय गव्हाळे** :- घरकुलाचे काम पूर्ण झाले का लाभार्थीना सांगा इतका वेळ लागणार.

**प्रकल्प विभाग प्रमुख श्री. मेहेत्रे** :- पाण्याच्या टाकीचे काम चालू आहे. मीटर कनेक्शनसाठी पत्र दिले आहे. महिना भरात टाकीचे काम होईल.

**मा.श्री.अभिषेक कळमकर** :- आयएचएसडीपी फेज-२ च्या ३७२ जणांना चाव्या दिल्या त्यापैकी काही जणांना पाण्याचे कनेक्शनचे काम झाले नाही. संबंधीत ठेकेदाराला बील पण अदा केले अनेक जण कुठेतरी महापौर केबीन, सभागृह नेता या ठिकाणी येतात.

**प्रकल्प विभाग प्रमुख श्री. मेहेत्रे** :- कार्यकारी अभियंत्यांना पत्र दिले आहे. महिना भरात उपलब्ध होईल.

**मा.श्री.अभिषेक कळमकर** :- निधी परत गेला तर कोण जबाबदार ?

**प्रकल्प विभाग प्रमुख श्री. मेहेत्रे** :- फेज-१ व फेज-२ चा ३० जानेवारी २०१७ चे आत पूर्ण ताबा देणार

**मा.श्री.अभिषेक कळमकर** :- अकौंट विभागाकडे बील अदा करायचे राहीले आहे असे ठेकेदार सांगतो आयुक्त यांनी संपर्क साधून विषयावर चर्चा करुन मार्ग काढावा.

**मा.श्री.विजय गव्हाळे** :- पाणीपुरवठा कुठून करणार ?

**प्रकल्प विभाग प्रमुख श्री. मेहेत्रे** :- आगरकर मळा येथील पाण्याच्या टाकीतून करणार आहे.

**अभियंता श्री.सोनटक्के** :- घरकुल योजनेसाठी गजानन कॉलनी संपवेल पासून ते काटवन खंडोबा संजयनगर येथील घरकुल योजनेतील टाकीचे बांधकाम करणार आहे. त्यातून पाणी पुरवठा केला जाणार .

**मा.श्री.विजय गव्हाळे** :- स्टेशन परीसरात पाणी पुरवठा कसा आहे.

**अभियंता श्री.सोनटक्के** :- वसंत टेकडी येथून जे पाणी उपलब्ध होते. त्याप्रमाणे पाणी वितरण केले जाते. विळद येथे ६०० एच.पी. चा पंप बसवल्यामुळे पाणीपुरवठयात फरक पडला आहे.

**मा.श्री.विजय गव्हाळे** :- अगोदर शटडाउनची कल्पना देत जा.

**मा.श्री.दिलीप सातपुते** :- काकडे उद्या व्हीजीट करा. एस.पी.ऑफिसचे किंवा इतर सरकारी कर्यालयाचे उद्‌घाटनापूर्वी कंम्प्लीशन बाबत विचारले जाते. लोकार्पण करताना काय केले होते. लाईटपाणीचे काम पुर्ण व्हायच्या आधीआयुक्तांना कल्पना दिली का महानगरपालिका प्रशासन मग हजर कसे राहीले कंम्प्लीशन नसतांना शासकीय प्रोग्राम कसा केला यापुढे काळजी घ्या. कंम्प्लीशनचे बंधन आहे का नाही ?

**प्रकल्प विभाग प्रमुख श्री. मेहेत्रे** :- घरकुल व इन्फ्रास्ट्रक्चरचे सर्व काम पूर्ण झाले केवळ पाण्याचे लाईनचे काम बाकी आहे.

**मा.श्री.दिलीप सातपुते** :- यापुढे काळजी घ्या.

**मा.श्री.अनिल शिंदे** :- घरकुल जवळ पाण्याची पाईपलाईन टाकली आत्ता आपण २ कोटी ५२ लाख संबंधीतांचे लवकर द्या. पाणी लाईट देवून लोकार्पण करायला पाहीजे. १५ दिवसात त्या लोकांना ताबा द्या. त्वरीत चेक द्या. वारुळाचा मारुती येथील घरकुलाचे ड्रॉ काढणेचे काम बाकी आहे. सर्व बाबी लवकर पूर्ण करा.

**प्रकल्प विभाग प्रमुख श्री. मेहेत्रे** :- काही लाभार्थीचे हिस्से भरणे बाकी आहे. त्यांचा लाभार्थी हिस्सा भरल्यावर त्वरीत ड्रॉ काढण्यात येतील.

**मा.श्री.विजय गव्हाळे** :- आधी त्या ठिकाणच्या सदनिका मधील नादुरूस्त झालेल्या शौचालयाचे दरवाजे दुरुस्त करा.

**डॉ.श्री.सागर बोरुडे** :- नवीन घरकुलाचे फॉर्म बाबत माहिती द्या.

**प्रकल्प विभाग प्रमुख श्री. मेहेत्रे** :- प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत १६००० अर्ज प्राप्त झ ाले आहेत. यामध्ये चार घटक आहेत. १) झोपडपट्टी पुर्नवसन २) कर्ज सलग्न व्याज ३) भागीदारी तत्वावर परवडणारी घरे ४) वैयक्तिक घरकुल बांधणे करिता अनुदान. त्यानुसार नागरिकांकडून त्या त्या घटकां अंतर्गत अर्ज मागविण्यात आले आहेत.जे काही कागदपत्र अपूर्ण आहे ते पूर्ण करुन वेब साईटवर अपलोड करणार आहे.

**डॉ.श्री.सागर बोरुडे** :- प्रसिध्दी कशी दिली लोकप्रतिनिधींना विचारात घेतले का ?

**प्रकल्प विभाग प्रमुख श्री. मेहेत्रे** :- सदर योजना राबविण्याकरिता प्रस्ताव मा.महासभेमध्ये सादर करण्यात आला होता त्यास मान्यता घेवून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.तसेच नागरिकांना योजनेची माहिती व फॉर्मचा नमुना बाबत दोन जिल्हास्तरीय व एक राज्यस्तरीय वर्तमान पत्रात जाहीरात देण्यात आली होती.

**डॉ.श्री.सागर बोरुडे** :- नगरसेवकांना फॉर्मची मुदत संपल्याचे माहिती नाही.

**मा.श्री.कैलास गिरवले** :- डॉक्टर सारखे लोकप्रतिनिधी वृत्तपत्र वाचू शकत नाही दुर्दैव आहे.

**प्रकल्प विभाग प्रमुख श्री. मेहेत्रे** :- दैनिक पुढारी व दैनिक समाचार व दैनिक नवा मराठा या वृत्तपत्रात प्रसिध्दी दिली होती.

**मा.श्री.कुमार वाकळे** :- केंद्राच्या ज्या योजना आहेत त्या संदर्भात एक प्रत नगरसेवकांकडे पाठवा त्याचा नागरिकांना लाभ येईल. प्रत्येकाकडे तो पेपर असेलच असे नाही.

**प्रकल्प विभाग प्रमुख श्री. मेहेत्रे** :- ३१ डिसेंबर पर्यत फॉर्म स्विकृतीसाठी मुदतवाढ दिली आहे ज्यांना फॉर्म सबमिट करावयाचा आहे. त्यांना सबमिट करता येईल. कोणी राहिले असेल तर भरायला सांगा.

**मा.श्री.सचिन जाधव** :- सर्व वृत्तपत्रात प्रसिध्दी दिली पाहीजे काही वॉर्डात स्लम व अनुसूचित जमातीची संख्या जास्त आहे. अशा वॉर्डातील विकास कामे करण्यासाठी अतिरिक्त निधी, विशेष निधीची मा. महापौर ,मा.उपमहापौर यांनी राज्य व केंद्राकडून मागणीसाठी प्रयत्न केले आहेत. याबददल त्यांचे अभिनंदन करतो. मा.महापौर व मा.उपमहापौर यांनी दलितवस्ती सुधार योजने अंतर्गत अतिरिक्त व अनुसूचित जमातीच्या प्रभागाच्या विकास कामांसाठी विशेष निधीची मागणी केली त्यात इतरही नगरसेवक सहभागी होउ शकतील या संदर्भात आपण रुलिंग द्यावे.

**मा.श्री.अनिल शिंदे** :- मा.शासनाकडून असा निधी प्राप्त झाल्यास त्यामध्ये कामे सुचविण्याचा अधिकार मा.महापौर साहेब यांना देण्यात यावा. आवश्यक असलेल्या ठिकाणची कामे प्राधान्याने घेण्यात यावी.

**मा.महापौर साहेब** :- मा.शासनाकडून मा.सदस्यांनी सुचविलेल्या योजने अंतर्गत अतिरिक्त निधी व विशेष निधी मनपास प्राप्त झाल्यास याबाबत कामे सुचविण्याचे अधिकार मा.महापौर यांना देण्यात येत आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- सभागृहातच असे शासनाचे आदेश, योजनांचे सभेच्या शेवटी व सुरुवातीला ज्या अशा योजना आलेल्या आहेत त्या वाचन केले तर प्रश्न निर्माण होणार नाही. दुसरा विषय मा. खासदार महिला नेत्यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. त्यांना आपण सांगायला पाहीजे. जोपर्यंत कंम्प्लीशन मिळत नाही. तोपर्यंत उद्घाटन होत नाही. प्रशासन ही चुक का करते. मागच्या बोर्डात २.५२ लाख १४ व्या वित्त आयोगातुन मंजूर करुन दिले. लाईट नाही, टाक्याचे काम अपूर्ण आहे. सन्माननीय सदस्यांना सांगा नगररचना संदर्भात त्यांचे मत घ्या कॅफोचे मत घ्या प्रत्येक योजना सक्सेस होईल. बेघरांना एक हॉल द्यायचा. नगररचनाकार यांचा अभिप्राय जागा झोपडपट्टीसाठी आरक्षीत आहे मग आत्ता आपल्याला देता येईल का? आरक्षण बदलता येते का ?ते आमच्या पुढे ठेवायला पाहीजे जी जागा बेघरांसाठी दयायची आहे. त्यासाठी एखादी जागा आरक्षीत का करुन घेत नाही तुम्ही बेघरांचा काय निकष लावला.

**प्रकल्प विभाग प्रमुख श्री. मेहेत्रे** :- एन.यु.एल.एम. विभागा मार्फत बेघरांचा सर्व्हे केला.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** स्नेहालयाचा उल्लेख आहे.

**प्रकल्प विभाग प्रमुख श्री. मेहेत्रे** :- सध्या एक प्रस्ताव आहे. आणखी दोन प्रकल्प उभारावयाचे आहेत.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- दोन प्रकल्पासाठी जागा शोधून ठेवा.

**प्रकल्प विभाग प्रमुख श्री. मेहेत्रे** :- नगररचनाकार यांचा स्पष्ट अभिप्राय दिला आहे की, सदर ठिकाणी योजना राबविणे अनुज्ञेय राहील.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- ज्या कारणासाठी जागा आरक्षीत आहे. तो पूर्ण झाला का ?

नगररचनाकार श्री.पाटील :- रहिवासी कारणासाठी अनुज्ञेय आहे. बेघर असणा-यांना निवासी कारणासाठी असल्यामुळे आरक्षणांना अनुज्ञेय वापर आपण करतो. आरक्षण बदलण्यांचा विषय नाही.

**प्रकल्प विभाग प्रमुख श्री. मेहेत्रे** :- अजुन २ जागा निश्चित करायच्या आहेत.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- २४ वर्षाचे सेवेचे बंधन ११४ घरा संदर्भात कमिटी काढते. ज्या सेवानिवृत्त कर्मचा-यांची सेवा २२-२३ वर्ष झाली त्यांची मा.शासनाकडे माहिती पाठवून मार्गदर्शन मागवा.

**उपायुक्त (सा) श्री.चारठाणकर** :- सदरची योजना ही केंद्र शासनाची आहे. यानुसार शहरातील बेघरांना रात्र निवारे बांधण्याचे प्रस्ताव शासनाकडे पाठवायचे आहे. शहराची भोगोलिक परिस्थिती पाहता व लोकसंख्या पाहता शहरात आणखी दोन ठिकाणी रात्र निवारे बांधणे आवश्यक आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे** :- नेहरुमार्केटच्या बाबतीत हायकोर्टा च्या ऑर्डर मधिल if the general body does not agree with the resolution passed by the standing committee, it is for the general body to take a decision. असे वाचन केले. २.४० कोटी व्हॅल्यू योग्य नसून जर मा.स्थायी समितीने ठराव पास केला तो जर मान्य नसेल तर महासभेत निर्णय घ्यावा याबाबत आम्ही २३ नगरसेवकांचे निवेदन या ठिकाणी देत आहोत.

**मा.सौ.रुपाली वारे** :- पॅचिंगचे कामाचे काय झाले.

**मा.महापौर साहेब** :- २ महिन्यानंतर करण्यांत येईल अशी माहिती दिली.

**मा.श्री.कैलास गिरवले** :- या जागेचे व्हॅल्युअर मार्फत व्हॅल्युएशन केले असता त्याची रक्कम रू. ९ कोटी इतकी आली आहे.

**शहर अभियंता श्री.राजपूत** :- पॅचींगची निविदा प्रक्रीयाचे १ आठवडयात होईल. आयुक्त साहेबांनी मंजूरी दिली आहे. पॅचींगची एकुण निविदा निघणार आहे. उपनगरातील सर्व रस्ते होणार. जो ठेकेदर आहे जास्त लोक लावून काम पूर्ण करणार.

**मा.महापौर साहेब** :- केडगांव व उपनगरातील रस्ते घेण्याबाबत मी सांगीतले आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर** :- आमच्या याद्या पॅचींगच्या घेतल्या नाही आम्हाला फोनही आला नाही.

**मा.श्री.कोतकर** :- नगरसेवकाला विचारुन फोन करुन पॅचींगची कामे करावीत.

**मा.श्री.अभिषेक कळमकर** :- एक दिवस उपनगरासाठी व एक दिवस केडगांव ला द्या.

**मा.सौ.दिपाली बारस्कर काळे** :- याद्या दिल्या पण कारवाई होत नाही. संबंधीत नगरसेवकांना कळवण्यात यावे.

**मा.महापौर साहेब** :- नगरसेवकांना कल्पना द्या.

**मा.सौ.सुवर्णा जाधव** :- आगरकर मळयातील लोकांना त्रास होतो. आगरकर मळा, खोकरनाला आयुर्वेद चौक पर्यंतचे पॅचींग करुन द्यावे.

**मा.श्री.कैलास गिरवले** :- नेहरु मार्केट संदर्भात जे निवेदन दिले पालिकेच्या आर्थिक हिताचा विचार करुन निर्णय घ्यावा. २०१० पासूनचे ठराव माझ्याकडे आहे. अधिका-यांचे अनुकुल मत नसतांना ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यांत आला. जर तुम्हाला दुरस्त्या सुचवायच्या होत्या त्याचा ऑफिस रिपोर्ट मध्ये उल्लेख न करता ठराव करतांना परस्पर बदल करण्यात आला मा.स्थायी समितीचा चुकीचा ठराव झालेला आहे. नव्याने हा विषय मा.महासभेसमोर घेण्यात यावा.

**मा.महापौर साहेब -** ऑफिस रिपोर्ट नुसार प्रस्ताव मंजूर. तसेच नालेगांव सर्व्हे नं. ४३/३ या ठिकाणा व्यतिरिक्त आणखी दोन ठिकाणी भविष्यात रात्र निवारे (NULM) अंतर्गत बांधणेस मंजूरी देण्यात येत आहे.

- - - - - - - - - -

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट व सभेत झालेल्या चर्चे नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या नालेगांव स.नं.४३/३ या ठिकाणी मनपाच्या जागेवर मा. केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान

(National Urban Livelihoods Mission) अंतर्गत शहरी बेघरांना निवारा बांधणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच नव्याने सर्व्हेक्षण करून बेघरांची संख्या वाढल्यास आणखी दोन ठिकाणी भविष्यात रात्र निवारे (NULM) अंतर्गत बांधणेस देखील ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

मा.राज्य व मा.केंद्र शासनाकडे नागरी दलितवस्ती सुधार योजने अंतर्गत विकास कामांसाठी अतिरिक्त निधी व अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या प्रभागातील विकास कामांसाठी निधी मिळणे बाबत सविस्तर प्रस्ताव मा.शासनाच्या संबंधीत विभागाकडे पाठविण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे. या योजने अंतर्गत कामे सुचविण्याचा ,फेर फार करण्याचा अधिकार मा.महापौर यांना देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

**सुचक** :- मा.श्री.दिलीप सातपुते

**अनुमोदन :-** मा.श्री.अनिल शिंदे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ३६** **दिनांक : २२ / १२ /२०१६.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये केंद्र शासनाच्या पुर्नरचित गतीमान विद्युत विकास व सुधारणा कार्यक्रम योजना अंतर्गत अहमदनगर शहरातील गणपती विसर्जन मिरवणुक मार्गावरील केबल टाकणेकरीता रस्ते खोदाई करणेस परवानगी देणे बाबत...

संदर्भ :- अधीक्षक अभियंता, म.रा.वि.जा.क्र.२६९ दि.१४/०२/२०१२ व इतर १६संदर्भीय पत्र....

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ : १] अधीक्षक अभियंता, म.रा.वि. जा.क्र. २६९ दि. १४/०२/२०१२.
२] शहर अभियंता, जा.क्र. ५१९२ दि. ३०/०३/२०१२.
३] उप अभियंता, जा.क्र. १७५० दि. ११/०७/२०१२.
४] कार्यकारी अभियंता, जा.क्र. ६०७५ दि. ३१/०७/२०१२.
५] उप कार्यकारी अभियंता, जा.क्र. ३७१ दि. ०३/०२/२०१३ व
६] उप कार्यकारी अभियंता, जा.क्र. ६७३ दि. ३१/०१/२०१३.
७] इकडील मागणी पत्र, विद्युत जा.क्र. २७० दि. २६/०९/२०१३.
८] कार्यकारी अभियंता, जा.क्र. १३८८ दि. २०/०२/२०१४.
९] इकडील पत्र सा.बां.वि जा.क्र. १० दि. ०४/०४/२०१४.
१०] अ.अ. यांचे पत्र जा.क्र. ११८५ दि. १४/०८/२०१४.
११] कार्यकारी अभियंता यांचे पत्र जा.क्र. ५७६७ दि. २७/०८/२०१४.
१२] इकडील पत्र जा.क्र. १७१ दि. २८/०८/२०१४.
१३] मा.खासदार श्री. दिलीप गांधी यांचे पत्र दि. २६/०६/२०१३ व दि. १३/०९/२०१६.
१४] इकडील पत्र जा.क्र. १५४ दि. १३/०६/२०१६.
१५] इतिवृत्त जा.क्र. ६३९ दि. १९/१०/२०१६.
१६] कार्यकारी अभियंता यांचे पत्र जा.क्र. ७२६४ दि. १३/१०/२०१६.
१७] कार्यकारी अभियंता यांचे पत्र जा.क्र. ७८१२ दि. ०७/११/२०१६.

उपरोक्त संदर्भिय विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये प्रथम RAPDRP या MSEB च्या योजनेअंतर्गत केलेल्या भुमिगत रस्त्याची खोदाईचे परवानगी करिता मागणी नुसार दिल्लीगेट ते झेड पी व जुनी महानगरपालिका ते जिल्हाधिकारी कार्यालय ४.४ कि.मी. करीता रिपोर्टला मा. आयुक्त यांची दि. २५/०९/१३ ला मान्यता घेवुन संदर्भिय पत्र ७ नुसार रक्कम रु. ६३,१८,६७५/- ची मागणी कळविली. त्यानुसार संदर्भिय पत्र ८ व ११ नुसार असे कळविले की, संदर्भिय पत्र ७ मधील अट क्र. ९ "भविष्यात रस्त्याचे रुंदीकरण किंवा इतर काम करावयाचे झाल्यास स्वखर्चाने इतरत्र हलविण्यात याव्यात" हि अट शिथिल करावी असे कळविले. अन्यथा सदर प्रकल्प होणार नाही असे कळविले. त्यावर मा. आयुक्त यांची दि. २८/०८/२०१४ रोजी मान्यता घेवुन सुधारीत मागणी पत्र रु. १,३७,७०,०००/- अट शिथिल केलेसहीत संदर्भिय पत्र १२ नुसार कळविले.

दरम्यान MSEB कडुन कोणताही पत्रव्यवहार झाला नाही परंतु संदर्भिय पत्र १५ नुसार दि. १५/०६/२०१६ व ०४/१०/२०१६ रोजी पुन्हा विषयांकित समस्येबाबत बैठक झाली व त्यामध्ये भविष्यातील लाईन केबल स्थलांतरीत करणे ही अट वगळुन सुधारीत मागणी देण्याचे ठरले. तसेच आढावा बैठकीचे संदर्भिय १६ चे इतिवृत्तातील मुद्दा क्र. ९ नुसार MSEB केबलचा शिफटींगचा खर्च MSEB करणार नाही व भविष्यात महानगरपालिकेला देखील परवाडणारा नाही. या करीता महासभेसमोर धोरण निश्चित करुन प्रस्तावित करुन करारनामा करणे अशी सुचना मा.आयुक्त यांनी केली.

त्यानुसार संदर्भिय पत्र १७ नुसार सुधारीत प्रथम टप्प्या करीता RAPDRP Part B करीता सविस्तर नाकाशासह १११०५ मीटर लांबीची खोदाई परवानगी मागितलेली आहे. त्याचा सविस्तर तक्ता सोबत जोडलेला आहे. तसेच संदर्भिय पत्र १८ नुसार शहराचे ५१ कि.मी. चे प्रकल्पापैकी प्राधान्याने प्रथम टप्प्या करीता १११०५ ची निविदा केलेली असल्याने फक्त १११०५ मी. ची परवानगी द्यावायची आहे. ती खालील प्रमाणे.

त्यानुसार प्रत्यक्ष साईटवर सर्व्हेक्षण केले असता १११०५ मी. डांबरी रस्ता खोदाई करावी लागणार आहे. डांबरी रस्ता मीटर याप्रमाणे खोदाई करावी लागणार आहे.

त्यानुसार खालिल प्रमाणे शुल्क आकारावे लागेल.

१) डांबरी रस्ता- १११०५ x १५०० १,६६,५७,५००/- (मा.महासभा ठराव अन्वये)
२) डब्लु बी. एम. रस्ता- ४६० रू.प्रति रनिंग मिटर W.B.M. खोदाई नाही
३) कच्चा रस्ता -: ५४ रू.प्रति रनिंग मिटर मातीतील खोदाई नाही

**एकुण = १११०५**

त्यानूसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये कार्यकारी अभियंता , अहमदनगर यांना वरीलप्रमाणे खोदकाम करणेस मा.शासन निर्णय

१) जमीन १०/२०००/प्र.क्र.९१/ज-१ दि.२७/४/२०००
२) शासन निर्णय क्रमांक डी.आय.टी./ फाईल - ०३/३३६ दि.१/४/२००६

अन्वये एकूण १११०५ मी. लांबीच्या खोदाईसाठी

परवाना शुल्क- शासन निर्णय क्रमांक डी.आय.टी./ फाईल - ०३/३३६ दि.१/४/२००६ मधील निर्णय क्र.५ मधील 'ब' मधील तक्त्यातील अ.क्र.' ब' नूसार २ वाहिन्या प्रणालीसाठी महानगरपालिका क्षेत्रामध्ये १५,००,०००/- रू प्रति कि.मी.साठी परिगणित केलेल्या एकूण प्रमाणकारी रकमेच्या ३% नगरपरिषद क्षेत्रासाठी व ६% महानगरपालिका क्षेत्रासाठी परवाना शुल्क निश्चीत करण्यात यावे असे सुचित केलेले आहे त्यानूसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये कार्यकारी अभियंता , अहदनगर या कंपनीला मा.शासन निर्णय क्र डीआयटी/फ़ाईल-०३/३३६ मंत्रालय,मुंबई-४०००३२ दि.१ एप्रिल, २००६अन्वये एकुण- १११०५ मी. लांबीच्या खोदाई साठी

| | | |
|---|---|---|
| परवाना शुल्क रु- ( एक डक्ट साठी ) १५,००,०००/-x ११.१०५ x ६ % = | | ९,९९,४५०/- |
| | खोदाई | - १,६६,५७,५००/- |
| | अनामत रक्कम ५ % | - ८,३२,८७५/- |
| | असे एकुण रुपये :- | १,८४,८९,८२५/- |

त्यानुसार एकुण रक्कम रू- १,८४,८९,८२५/- इतक्या रक्कमेपैकी कंपनीकडून रुपये १,६६,५७,५००/- ही खोदाई शुल्क म्हणून व परवाना शुल्कापोटी ४,९९,७२५/- (५० टक्के) म्हणुन वेगळा धनादेश घ्यावा लागेल व अनामत रक्कमेपोटी रु- ८,३२,८७५/- रकमेचा धनादेश वेगळा घ्यावा लागेल. याप्रमाणे सदर कंपनीकडून या कामासाठी खोदाई शुल्क - १,६६,५७,५००/-+ परवाना शुल्क- ४,९९,७२५/- + अनामत रक्कम रु. ८,३२,८७५/- + वर्तमान पत्रात प्रसिध्दी देणे कामी अंदाजे २०,०००/- असे एकुण = १,८०,१०,१००/- इतकी रक्कम महानगरपालिकेकडे भरून घ्यावी लागेल. तसेच शासन निर्णय क्र.डी.आय.टी./ फ़ाईल -०३/३३६ दि.१/४/२००६ मधील निर्णय क्र.५ मधील 'क' नुसार परिगणीत होणारी एक रकमी परवाना शुल्कापैकी अर्धी रक्कम (५० टक्के) म्हणजेच ४,९९,७२५/- अर्जदारास परवानगी देतांना शासनास देय असेल तसेच सदरर्ची रक्कम अर्जदार यांनी माहिती तंत्रज्ञान संचलनालयाकडे अहमदनगर महापालिकेमार्फ़त जमा करावी लागेल. कंपनीस नियमानुसार करारनामा करुन द्यावा लागेल व त्यानंतर महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहुन संबंधीत कंपनीस रस्ते खोदाईस परवानगी देता येईल.

इतिवृत्त जा.क्र. ६८९ दि. २२/६/२०१६ अन्वये खोदाई पोटी मिळाणारी रक्कम रु. १,६६,५७,५००/- वजा पॅचिंग करीता लागणारी रक्कम रक्कम रु. ४०,७५,७८३ /-वगळता रक्कम रु. १,२५,८१,७१७/- रस्ते पॅचिंग करीता इतर विविध रस्ते पॅचिंग करीता म. न. पा. निधी मध्ये वर्ग करणे किंवा मा. महासभा ठराव ०१ दि. १४/६/२०१६ अन्वये या बाबत आदेश होणे उचित वाटते. तसेच मागणीनुसार रक्कम प्राप्त होईपर्यंत ४०,७५,७८३/- रकमेची ई निविदा काढुन कार्यादेश पर्यंतची कार्यवाही करणे योग्य व प्रत्यक्षात रक्कम प्राप्त झाले वरच कार्यादेश देणे योग्य.

तसेच संदर्भिय इतिवृत्त १६ तील मुद्दा क्र. ९ करीता मा. महासभेची धोरण निश्चित करावी लागेल. परंतु तो पर्यंत खोदाई शुल्काची मागणी कळविणे करारनामा करणे योग्य व मा. महासभेचे धोरण निश्चितीनंतर व खोदाईला परवानगी देणे योग्य. तसेच जरी केबल भुमिगत झाली तरी ११ कि.मी मध्ये ३७० पिलर उभे राहणार आहे हे महासभेच्या निदर्शनास आणणे योग्य तसेच काम पुर्ण झालेनंतर अनामत रक्कम देणे पुर्वी झालेल्या कामाचा Submission Plan देणे बंधनकारक करणे योग्य वाटते.

**काम करते समयी खालील नियम व अटींच्या अधिन राहून परवानगी देणे योग्य होईल.**

**१)** खोदाई करण्यापूर्वी महानगरपालिकेच्या शहर अभियंता , शाखा अभियंता यांना पुर्व सुचना देण्यात यावी व कामाची लाईन आउट नगररचना विभागाकडुन रस्त्याचे अंतिम रूंदीला टाकावी

**२)** रस्ता खोदाईच्या परवानगी व्यतिरीक्त रस्त्याचे खोदाई काम करू नये तसेच काम करतेवेळी खोदाई करणारे कामगार यांचेकडे परवानगीची प्रत व नकाशा उपलब्ध ठेवावा.

**३)** नकाशात दर्शविलेल्या रस्त्याच्या लांबीपेक्षा जास्त लांबीचा रस्ता खोदू नये.

**४)** सदर रस्त्याचे खोदाई काम करतांना महानगरपालिकेच्या भुयारी गटर, पाण्याची पाईपलाईन , ड्रेनेज लाईन यांची कोणतेही नुकसान होणार नाही , याची काळजी घ्यावी व झाल्यास त्याची जबाबदारी आपल्यावर राहील व त्याची दुरूस्ती खर्च आपणांस करावा लागेल तसेच पाण्याचे व ड्रेनेज लाईनच्यावर त्यांचे आजुबाजुस ०.५ मी.अंतर सोडुन भुमीगत केबल टाकावी.

**५)** रस्ता खोदाई काम करतांना निघालेली जादा माती व मातीचे ढिग याची वाहतुक करून त्याची विल्हेवाट लावावी.

**६)** सदर कामाचा परवानग़ी मिळाल्यांनतर सदरचे काम ६० दिवसात पुर्ण करण्यात यावे याची

नोंद घ्यावी व तसे न केल्यास परवानगी रद्द समजावी व सदर ठिकाणी मुदतीनंतर भुमीगत केबल टाकावयाची झाल्यास पुनश्च परवानगी घेणे अनिवार्य आहे.

७) खोदाईमुळे अपघात होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीताची राहील.

८) काम करत असतांना वाहतूकीच्या दृष्टीने सुरक्षा कठडे उभारावीत.

९) सदरची देण्यात येणारी परवानगी फक्त अहमदनगर महानगरपालिकेच्या रस्त्यासाठी देण्यात येईल.

१० ) भुमीगत विद्युत केबलमुळे भविष्यात काही अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यकारी अभिंयंता विद्युत वितरण कंपनी यांची अहमदनगर यांची राहील.

११) वेळोवेळी झालेल्या कामात भविष्यात पुन्हा खोदाई करावी लागल्यास त्यावेळी स्वतंत्र माण्यता घेणे बंधनकारक राहिल.

१२) अटींचा भंग झाल्यास दिलेली परवानगी रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना राहिल.

१३) अनामत रक्कम देणे पुर्वी झालेल्या कामाचा Submission Plan देणे बंधनकारक राहिल.

तरी वरील अटी शर्तीस अधिन राहुन कार्यकारी अभियंता, विद्युत वितरण कंपनी, अहमदनगर यांना रस्ता खोदाईसाठी परवानगी देणेबाबत रिपोर्ट अवलोकनार्थ व आदेशार्थ सविनय सादर तसेच परवानगी देताना परवानगीची माहिती नागरीक, पदाधिकारी यांना होत नसलेकारणाने प्रत्यक्ष खोदाई करतेवेळी विनाकारण वाद होत असलेने पुणे , महानगरपालिका चे धर्तीवर परवानगीची माहिती मनपाचे वेबसाईट तसेच जिल्हास्तरीय वर्तमानपत्र व स्थानिक वर्तमानपत्रामध्ये देणे योग्य व येणारा खर्च संबंधित कंपनीकडुन वसुल होणे योग्य.

तसेच परवानगी पोटी घेतलेल्या रकमेतुन संबंधित कंपनीने खोदाई केलेनंतर त्वरीत पॅचींग झाल्यास नागरीकांचे कामाबाबत समाधान होईल व मनपाचे कर्तव्य त्वरीत बजाविणेस मदत होईल. त्याकामी सोबतच्या अंदाजपत्रकाप्रमाणे रक्क्कम रू.४०,७५,७८३/- चे अंदाजपत्रक जमा केलेल्या रकमेतुन मंजुर करून त्वरीत प्रस्तावास कार्यादेश देणे योग्य म्हणजे खोदाई करून झालेनंतर त्यामागे पॅचींगचे काम त्वरीत चालु करणे योग्य तसेच केबल खोदाई व्यतिरीक्त चेंबर बांधणे किंवा इतर तत्सम कामाची परवानगीची तरतुद नाही याची दक्षता संबंधित कंपनीस घेणेस कळविणे योग्य.

वरील प्रमाण महानगरपालिका हद्दीत रस्ता खोदाई करीता मंजुरी देणेस सादर

१] संदर्भिय इतिवृत्त १६ ती मुद्दा क्र. ९ करीता मा. महासभेचे धोरण निश्चित करणे करीता प्रस्ताव मा. महासभेकडेस पाठविणेस सविनय सादर.

२] सोबतच्या मसुद्या प्रमाणे रस्ता खोदाई पॅचींग करीता रक्कम रुपये ४०,७५,७८३/- ची ई निविदा राबविणेस व येणा-या खर्चास मान्यतेस सादर व प्रत्यक्ष निधि प्राप्त झालेनंतरच पॅचींग कामाचे कार्यादेश देणेस मान्यतेस सादर.

३]भुमीगत केबल खोदाईप पोटी मिळणारी रक्कम रु. १,६६,५७,५००/- वजा पॅचिंग करीता लागणारी रक्कम रक्क्म रु.४०,७५,७८३ /-वगळता रक्कम रु. १,२५,८१,७१७/- रस्ते पॅचिंग करीता इतर विविध रस्ते पॅचिंग करीता म. न. पा. निधी मध्ये वर्ग करणे किंवा मा. महासभा ठराव ०१ दि.१४/६/२०१६अन्वये कार्यवाही करणे करीता मा. मुख्यलेखाधिकारी, म न पा यांना या बाबत आदेश होणेस मान्यतेस सादर.

४] सोबतच्या मसुद्याप्रमाणे स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी देणेस व येणा-या खर्चास मान्यतेस सादर.

यावर इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.सातपुते यांचा अभिप्राय की, उपरोक्त रिपोर्टमध्ये नमूद केल्या प्रमाणे १५/०६/२०१६ व ०४/१०/२०१६ बैठकी मध्ये झालेल्या चर्चा नुसार M.S.E.B. भुमिगत केबल भविष्यात रस्त्याच्या कडेला शिफ्टींग करणार नाही असे संदर्भीय पत्र क्र.५७६७ दिनांक २७/०८/२०१४ मध्ये कळविले आहे. तरी सदर बाबत आदेशार्थ सादर.

यावर शहरअभियंता श्री.सोनटक्के यांचा अभिप्राय की, अहवालानुसार महा.राज्यवितरण कं.अहमदनगर यांचे मागणीनुसार १११०५.०० मी.लांबीची भुमिगत केबल टाकणेसाठी मनपाचे मालकीचे डांबरी रस्ता खोदणेचे चार्जेस भरून घेवून भुमिगत केबल टाकणेस परवानगी देणेस व भविष्यात रस्त्याचे रुंदीकरणात बाधित होणारी भूमिगत केबल स्थलांतरीत करणे महा.राज्य विज कंपनीची मागणी नुसार अट शिथील करणेत आली आहे. मात्र जा.क्र.साप्रवि-६३९ दि.१९/१०/२०१६ चे मुद्दा क्रमांक ९ नुसार भुमिगत केबल स्थलांतरी करणेची गरज भासल्यास त्याचा खर्च कोणी करावा याबाबत धोरण निश्चीत करणे आवश्यक आहे. तूर्त डिमांड नोट देणेस मान्यतेस सादर.

सदर बाब धोरणात्मक असलेने मा.महासभेची मंजुरी आवश्यक असलेने सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर लेखापरीक्षक श्री.अनारसे यांचा अभिप्राय की, अ  प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त श्री.विलास वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, उपरोक्त अ प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साहेब यांचा अभिप्राय की, कृपया मु.ले.प. यांचे अभिप्राय घ्यावेत.

यावर मुख्यलेखापरीक्षक श्री.अनारसे यांचा अभिप्राय की, शासन निर्णय दि.२७/०४/२०० ,०१/०४/२००६ मा.महासभेने निश्चीत केलेल्या दराने भरणा करुन घ्यावयाच्या रक्कमेची विभागाने केल्याचे प्रस्तावावरुन दिसुन येते. रु.२५ प्रती मीटर बँक गॅरंटी ऐवजी रोख स्वरुपात ५% अनामत रक्कम भरुन घेणे प्रस्तावित आहे. शहर अभियंता यांच्या परि.  अ  स्थित प्रस्तावानुसार कार्यवाहीस हरकत नाही.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त श्री.विलास वालगुडे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

---*---

**चर्चा -**

**मा.श्री.दत्तात्रय कावरे** :- नेहरुमार्केटचा विषय आपण चर्चेला घेणार का नाही ते सांगा ?

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब** :- मा.न्यायालयाचे आदेशाची प्रत दिली. सही शिक्क्याच्या कोर्टाच्या नकला प्राप्त झाल्यानंतर वकीलांचा अभिप्राय घेवून पुढील कार्यवाही करण्यांत येईल. मा.कोर्टाच्या जजमेंटचा अभ्यास करुन उचित निर्णय घ्यावा लागेल.

**मा.श्री.कैलास गिरवले** :- कधीही रेडीरेकनरचे दर वाढतात पण इथे कमी झाले. शासकीय व्हॅल्यूअर ने जी ९ कोटी व्हॅल्यू दिली ती योग्य असणार पालिकेच्या आर्थिक हिताचा विचार व्हायला हवा.

**मा.डॉ.सागर बोरुडे** :- शहराचा आत्मा आहे. वकीलांचा अभिप्राय घेण्यात आला नव्हता का ?

**मा.श्री.दिप चव्हाण** :- सर्टिफाईड नक्कल त्यांचेकडे नाही. आयुक्त साहेब आपण योग्य बोलला. संस्थेच्या आर्थिक हिताचा प्रश्न असेल नेटवर टाकल्यानंतर अर्ग्युमेंट होवून हा निर्णय झालेला आहे. सभागृहाला हा अधिकार आहे. तुम्ही केलेल्या प्रोसेस हायकोर्टाने आलेल्या ३ निविदा उघडा असे कुठेही नाही. आजच्या मितीला स्थायी समितीच्या ५ सदस्यांनी सह्या घेवून सभा घेता येते. त्याप्रमाणे २३ नगरसेवकांची सह्यानिशी पुढच्या वेळचा विषय पत्रिकेवर विषय घ्या एवढीच विनंती पुढच्या सभेत घेणार की नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार तुम्हाला अधिकार आहे.

**मा.महापौर साहेब** :- कोर्टातुन जसे जजमेंट आले तसे घेवू.

**मा.सौ.सुनिता कांबळे** :- फेज-१ केडगांव पाणीपुरवठा योजना बाबत माहिती द्यावी. योजना ३०% राहिली ती केंव्हा पूर्ण होणार.

**मा.श्री.सुनिल कोतकर** :- १३.०० कि.मी. पाईप खरेदी करायचे, २ कोटी रुपये शिल्लक आहेत मग पाईप का खरेदी करीत नाही.

**अभियंता श्री.सोनटक्के** :- निविदेतील तरतुदीनुसार कामे पूर्ण झालेली आहेत.

**मा.सौ. सुनिता कांबळे** :- काकडेमळा, कांबळे मळा, लोंढे मळा येथे पाईपलाईन टाकल्या नाही. नळ कनेक्शन दिले नाही.

**अभियंता श्री.सोनटक्के** :- अंदाजपत्रकानुसार सर्व पाईप लाईन पूर्ण झाले आहे. ज्या नागरिकांनी पैसे भरले त्यांना नळ जोडून देण्यात आले. ठेकेदारांना तशा सूचना दिल्या त्याचे पेमेंट राहिले आहे. डी.आय. पाईप उपलब्ध नसल्याने काम बंद होते.

**मा.श्री.सुनिल कोतकर** :- दुस-या एखाद्या अधिका-यावर जबाबदारी सोपवा.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम** :- ही पाणीपुरवठा योजना माझ्याकडे आहे. मुळ योजना डीपीआर प्रमाणे १०० % काम पूर्ण झाले आहे. टाक्याची चाचणी चालू आहे. ठेकेदाराकडून जोडणीचे कामे जी प्रलंबित आहे. त्या संदर्भात ठेकेदाराला सूचना देण्यात आलेल्या आहेत. ३ टाक्याद्वारे - पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आलेला आहे. स्टेशन रोड परिसरात तात्पुरत्या स्वरूपात नगर पाण्याची टाकी येथून पाणी घेण्यात आलेले आहे. या भागातील पाणी पुरवठा डीपीआर प्रमाणे पूर्ववत करुन देणार.

**मा.श्री.सुनिल कोतकर** :- बालाजी संपवेल मध्ये पाणी पडत नाही विळद येथून जो पाणी पुरवठा होतो त्याचा टाईमिंग वाढवून घ्या.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम** :- विळद, मुळानगर येथे पंप बसविण्यांत आल्यामुळे येत्या १५ दिवसात फरक दिसेल.

**मा.श्री.सुनिल कोतकर** :- फेज - १ संदर्भात स्वतंत्र मिटींग ठेवा. महापौर यांनी लक्ष घातले पाहीजे.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम** :- जास्तीचा निधी शिल्लक नाही बील अदा करायचे राहीले आहे. त्यामुळे रक्कम शिल्लक दिसते. वाढीव हद्दीचा फेर सर्व्हेक्षण केले त्याचे अंदाजपत्रक केले आहे त्याचे १ कोटी एस्टीमेंट रिॲप्रोप्रिएशनच्या वेळेस मंजुरी घेवून निविदा मागवून घेवू.

**मा.श्री.सुनिल कोतकर** :- योजना केव्हा पूर्ण होणार. जिथे पाणी जात नाही तिथे काय करायचे श्री.निकम साहेब, श्री सोनटक्के साहेबांना सांगा काय उपाय योजना कारता येईल ते पाहू नवीन पाईपलाईन टाकली तिथे नळ कनेक्शन देवू. जुन्या लाईनची फॉल्ट सोनटक्के साहेब समक्ष पाहतील.

**मा.श्री.दिलीप सातपुते** :- मंगळवारी केडगांव पाणीपुरवठा योजना संदर्भात मिटींग बोलविण्यात यावी.

**मा.महापौर साहेब** :- मिटींग आयोजित करून केडगांव मधील मा.सदस्यांना कळविण्यात यावे.

**मा.श्रीमती.भिंगारदिवे सुनिता** :- उपनगरात चार दिवसा नंतर पिण्याचे पाणी दिले जाते. त्यामुळे पाणीपट्टी बील अर्धे घेण्यांत यावे.

**मा.श्री.दिलीप सातपुते** :- केडगांव ग्रामपंचायत कार्यालयाला कलर दिलेला नाही. लोकमतमध्ये बातमी आली आहे.

**मा.श्रीमती.भिंगारदिवे सुनिता** :- वर्षातील ३६५ दिवसा पैकी फक्त १५० दिवस पिण्याचे पाणी येते त्यातही लाईट जाते, पाईप लाईन तुटते त्यामुळे अर्धी पाणी पट्टी घेण्यात यावी.

**मा.श्री.कैलास गिरवले** :- अमृत योजना निविदा रद्द करण्याचा ठराव का केला. केडगांव मध्ये किती टाक्या चालू आहेत , किती अपूर्ण आहेत.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम** :- केडगांव मध्ये ५ टाक्या होत्या. तीन टाक्यातून पाणी वाटप चालू केल्यावर पाण्याची कमतरता असल्याने उर्वरित टाक्या चालू करता आलेल्या नाही.

**मा.श्री.कैलास गिरवले** :- ०७/१०/२०१० ला संबंधीत ठेकेदाराला पत्र दिले. काम वेळेत पूर्ण झाले नसेल तर ५००० रुपये दंड आकारणी करायला काय झाले.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम** :- काम पूर्ण न झाल्याने पत्र दिले नाही.

**मा.श्री.कैलास गिरवले** :- २०१४ ला परत पत्र दिले काम पूर्ण झाले नसतांना नोटीस दिली. आत्तापर्यंत किती दंड जमा केला.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम** :- जो काही दंड आहे तो वसुल होईल. त्याचा प्रोग्रॅम वाढला त्यानंतर १ हजार दंड आकारला आहे.

**मा.श्री.कैलास गिरवले** :- २०१४ ला रुपये १०००/- आकारता आणि २०१० ला रू.५०००/- लावता पालिकेचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. ५२ रस्त्याच्या अनुषंगाने पत्र दिले. मा.आयुक्तांनी आश्वासन दिले चौकशी करुन पुढच्या सभेत उत्तर देवू काय झाले. वालगुडे साहेबांची नियुक्ती केली त्यांनी कोणाची नियुक्ती केली.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब** :- अतिरिक्त आयुक्तांना बाब तपासून घ्यायला सांगीतली प्राथमिक माहिती शहर अभियंता देतील. अतिरिक्त खुलासा- अतिरिक्त आयुक्त देतील रस्त्याचे सगळे काम बेसीक शहर अभियंता यांचे कडे आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर** :- त्या भागाचा इंजिनियर, शहर अभियंता, कॅफो हे सर्व डल आहेत. एकाच कामाची दोनदा बीले निघाली. जर तसे झाले असेल तर इथेच चर्चा होवून विषय संपेल. जे चुकीचे आहे ते चुकीचेच आहे.

**अतिरिक्त आयुक्त श्री.वालगुडे साहेब** :- मा.आयुक्त साहेब यांनी विषय माझ्याकडे दिले. बांधकाम विभागाला सविस्तर माहिती द्या असे सांगीतले. सध्या बांधकाम विभागाकडे शहर अभियंता नव्याने नियुक्त झालेले आहेत. त्यांचेकडे संपूर्ण माहिती मागितली आहे. त्यांचेकडून माहिती आल्यावर त्याबाबतचा १५ दिवसात अहवाल मा.आयुक्त साहेब यांचेकडेस दिला जाईल.

**मा.श्री.कैलास गिरवले** :- एका अधिका-याला संबंधीत ठेकेदाराने चार लाख रूपये दिले आहे. अशी माहिती मिळाली आहे. मुलभुतची कामे टेंडर दराने दिल्याबाबत मी अपले अभिनंदन केले. ही निगोसिएशन करणारी कमिटी असते. आमचा पैसा जर वाया जाणार असेल तर आमची तळमळ आहे. वाटाघाटी बंद केल्या त्यावेळी ४ लाख रूपये दिले. दोन ठेकेदारांनी ३-४ अधिकारी यांचे मिळून दिले. आता ते अधिकारी पैसे द्यायला तयार नाहीत.

**मा.श्री.अभिषेक कळमकर** :- महापौर शहर विकास निधीतून २०१६-१७ मधील बोगस कामाच्या बाबतीत वर्तमानपत्रात ४८ कामे मी महापौर असतांना कामे प्रस्तावित केली. २० लाखाच्या ७ कामांची कुठलेही बील अदा झालेले नाही. आम्ही कर्मचा-यांकडून ऐकले विशेष नगरसेवकांच्या फाईल पळविल्या जातात, नंतर ब्लॅकमेलींग केले जाते.

**मा.श्री.कैलास गिरवले** :- याबाबत मा.आयुक्तांनी गांभीर्याने लक्ष घालावे काल सकाळला बातमी आहे. अप्पू चौक अंधारात, गेल्या आठ वर्षापासुन अंधारात. आयुक्त साहेब एक काम ४८ लाख अत्याधुनिक पथदिवे बसविणे आहे. नक्की कोणते पथदिव्यांसाठी आपण खर्च करणार आहात.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.सावळे** :- प्रेमदान चौक, प्रोफेसर कॉलनी, मकासरे हेल्थ क्लब येथे अत्याधुनिक दिवे बसविणार.

**मा.श्री.कैलास गिरवले** :- अद्यावत म्हणजे कोणत्या प्रकारचे हे आयुक्तांनी सांगावे.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.सावळे** :- सर्जेपुरला जे ६ मीटरचे पोल आहेत त्या पध्दतीने पथदिवे बसवायचे आहेत.

**मा.श्री.कैलास गिरवले** :- पहिले पोल काय करणार.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.सावळे** :- ते तसेच ठेवायचे.

**मा.श्री.कैलास गिरवले** :- हे कळवायची काही गरज आहे का ?

**मा.श्री.अभिषेक कळमकर** :- पोलचे काय करायचे आयुक्त ठरवतील.

**मा.श्री.कैलास गिरवले** :- पालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता अशा पध्दतीने पैसे खर्च करायचे का ? आयुक्त डोळे झाकुन एस्टीमेट न पाहता सह्या करतात. जर बसवायचे असतील तर जुने पोलचे काय करणार. एकाच ठिकाणी दोन पोल आम्ही सहन करणार नाही.

**मा.श्री.सचिन जाधव** :- एवढे आरोप प्रत्यारोप झाले इतके भयंकर आरोप झाले. या सभागृहाची प्रतिमा मलिन होवू नये या सर्व कामाचे थर्ड पार्टी इन्स्पेक्शन करा. अधिका-यांवर विश्वास नाही.

**मा.श्रीमती.उषा नलवडे** :- १३/५/२०१५ ला आयुक्तांकडे पाणीपुरवठा बाबत पाठपुरावा केला वॉलमन पाणी सोडण्याच्या बाबतीत बेफीकीर आहे. पाणी सोडण्यासाठी पैशांची मागणी करतो. नागरिकांच्या समस्येला वारंवार वॉलमनला फोन करावा लागतो.

**अभियंता श्री.काकडे** :- मी समक्ष पाहणी केली. त्या ठिकाणी २०० फुट पाईप लाईन टाकल्यानंतर प्रॉब्लेम सुटेल.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे** :- विळद ते नगर पर्यंत लवकरात लवकर पाणी येण्यासाठी ३ कोटी २० लाख भरले तर पाण्याचा प्रश्न सुटेल. हे पैसे का भरले जात नाही. सर्व नगर शहरात पाण्याचा प्रश्न आहे. निकम साहेबांच्या घराशेजारी पाणी कमी येते.

**अभियंता श्री.काकडे** :- आदर्श कॉलनीतील प्रश्न १५ दिवसापुर्वी आला काम पण चालू आहे. दोन ठिकाणी फॉल्ट सापडले जोपर्यत पाणी येत नाही तोपर्यंत काम चालू राहील.

**मा.महापौर साहेब** :- एक मिटींग लावून प्रश्न मार्गी लावा. पैसे कशातुन भरायचे या संदर्भात मिटींग लावुन मा.आयुक्त साहेब निर्णय घेतील.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब** :- ते पैशाशी निगडीत आहे. पैशाचे सोंग मी काही करु शकत नाही. मा.महापौर , मा.उपमहापौर ,कॅफो यांचे समवेत बैठक घेवू.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे** :- आपण कलेक्टर व्हा, सेक्रेटरी व्हा मा.शासनाकडून किती निधी मागवला, फेज-२ च्या कामाला स्पीड द्या.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब** :- मा.महापौरांकडे पुढच्या आठवडयात बैठक घेवून वेगवेगळया कारणासाठी उपलब्ध निधीतुन किंवा अन्य काही कामे करावयाची असेल याबाबत बैठक घेवून निर्णय घेवू.

**मा.डॉ.सागर बोरुडे** :- सत्यम हॉटेल जवळ स्ट्रीटलाईट चे काम का चालू करत नाहीत. त्यावर पैसे उपलब्ध आहेत.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.सातपुते** :- रस्त्याचे काम तीन महिन्यापूर्वी चालू झाले आहे. रस्त्याचे काम झाल्यानंतर लाईटचे काम सुरु होणार आहे. आठ दिवसात काम सुरू केले नाहीतर नियमाप्रमाणे त्याच्यावर कारवाई करु.रस्त्याच्या हद्दीमुळे वेळ गेला. मुदतवाढ देवून काम करता येईल. एस.एस.इलेक्ट्रीक यांचेकडे काम दिले आहे. फाईल माझ्याकडे नसते.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- ३ कोटी २२ लाख हायटेन्शनसाठी भरायचे, कमी खर्चात आपण टाकणार मग कशाचे ३ कोटी २२ लाख भरायचे सर्व आरोप प्रशासनावर होत असेल तर प्रशासन कामच करीत नाही का ? नगरसेवक माहिती गोळा करुन आपणा समोर आणतात. प्रशासनाची झालेली हानी कुठेतरी उत्तरे द्या. प्रशासन काही बोलत नाही. महापौरांना संबोधीत करुनच उत्तर द्यायला पाहीजे. अजेंडयावरील विषय अगोदर चर्चेला घ्यावे. चांगली सूचना मांडली. पाणी पुरवठा संदर्भात अनेकांनी प्रश्न मांडले. प्रत्येक सभेला पोटतिडकीने चर्चा होते. केडगांवची योजना १० वर्षे झाली काम पूर्ण होत नाही कुठेतरी दखल घ्या या प्रश्नावर एक स्वतंत्र सभा घ्या.

मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय वाचन केला ५% अनामत रक्कम घ्यावी ९ नंबर अट वगळून एकूण रक्कम किती आहे. ९ नंबर अट काय आहे. २०००-२००६ नंतर रेटच बदलले नाही का

**मुख्यलेखापरीक्षक श्री.अनारसे** :- २००६ नंतर मा.शासनाचे खोदाईचा दर सुचविला, मा. शासनाच्या दरानुसार खोदाईची आकारणी रक्कम भरुन घेतली जाते. जी अनामत रक्कम भरुन घेतांना बँक गॅरंटी ऐवजी रोख स्वरुपात घेतल्यास व्याजाच्या स्वरुपात लाभ घेण्यात येवू शकतो.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.सातपुते** :- वेळोवेळी भविष्यात खोदाई करावी लागल्यास त्या खर्चास पुन्हा मान्यता घ्यावी लागणार.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- ४० कोटी रस्त्याच्या कामात आमदार निधी, मनपा फंडातून काही रस्ते घेतले असतील त्या संदर्भात इथे काही म्हटले नाही. काही ठिकाणी पॅचींगचे काम झाले आहे. ते कोणते रस्ते खोदाई करणार ?

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.सातपुते** :- ११ KM एरिया आहे. MSEB ने दिलेले मार्ग आहे मार्ग वाचुन दाखविले रक्कम १ कोटी ८४ लाख खोदाईचे काम ते करणार जसा रस्ता असेल तसे त्यावर आपण पॅचिंग करणार. भविष्यात रुंदीकरण झाल्यास पुन्हा वाढीव रस्त्याच्या कडेला केबल स्थलांतर करण्यास एमएसईबी तयार नाहीत. म्हणून हा विषय मा.महासभेपुढे आणला.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- २०१२ पासून एवढा उशीर का ?

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.सातपुते** :- मधल्या कालावधीमध्ये त्यांना पत्र पाठवूनही कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यांनी दि.१३/०९/२०१६ नंतर आपल्याकडे पाठपुरावा केला चर्चा केली असता त्यांचेकडे ठेकेदार नव्हता असे सांगितले.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- हायटेन्शन संदर्भात एवढे पैसे लागणार का ? ३ कोटी २२ लक्ष लागणार का ?

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम** :- शहर सुधारीत पाणी पुरवठा योजने अंतर्गत पंपासाठी लोड वाढवुन मिळण्यासाठी, विळद येथील लोड वाढवण्यासाठी, परत नव्याने लाईन टाकण्यासाठी, ४.५० कोटी भरा असे सांगितले होते. त्यामुळे याबाबत परत पत्र व्यवहार केला. त्यांनी नव्याने फेर सर्व्हेक्षण करुन ३ कोटी २२ लक्ष रुपये भरण्यास सांगीतले.

**मा.श्री. दिप चव्हाण** :- प्रशासन लेव्हलवर आपण चर्चा करा. परत त्याच लाईनवर दया असे सांगा तुम्ही पण ए.सी. शी बोला. सदरच्या संदर्भात त्यांनी मान्य केले नाहीतर त्याचे टप्पे पाडा त्यांना काम चालू करायला लावा.

**मा. महापौर साहेब** :- या संदर्भात मिटींग लावण्यात येईल.

**मा.श्री. सचिन जाधव** :- ज्या ठिकाणी मोहरम मार्ग आहे ते मार्ग वगळले आहे ते घ्यावेत. तसेच कोठला ते मंगलगेट ते आडतेबाजार चौक, हवेली ते कोंडया मामा चौक हे वगळलेले मार्ग आहेत ते घेण्यात यावेत. दोन ते तीन वेळा ४-५ वर्षात एमएसईबीचा निधी परत गेला मा.खासदारांनी गेल्या वेळी मिटींग घेतल्या आपण जी अट शिथील केली ती गरजेची आहे. मनपा सावेडी मधील जागा देत आहोत त्याचे कॅलक्युलेशन करून दुरूस्ती करावी.

**मा.श्री. सुवेंद्र गांधी** :- २०१२मध्ये ६० कोटी ला मंजूरी आणली, सदर कामास एमएसई बी कडून विलंब झालेला आहे. मा.शासनाचा निधी परत जाण्यापेक्षा गणेश विसर्जन मार्गावर विज तारांचे अडथळे निर्माण होतात तरी भविष्यात रस्ता रूंदीकरण झाल्यास केबल स्थलांतरीत करण्याचे काम मनपाने करावे. याकामामध्ये फेज -२ च्या पाईप लाईन जाणार आहेत. एकाच वेळी योजना राबवाव्या या कामासाठी ११ कोटी मिळणार आहे. खोदाई झालेल्या रस्त्याचे डांबरीकरण हे दोन्ही काम एकाच वेळी चालू करा. म्हणजे पैशाची बचत होईल. मा.महापौर, मा. उपमहापौरांनी हा विषय मार्गी लावल्याबदल अभिनंदन.

**मा.श्री. कैलास गिरवले** :- विसर्जन मार्ग माळीवाडयाशी निगडीत आहे. मुंजोबा मंदिरापासून सुरूवात दाखविली. विशाल गणपती पासून आमन पाटील रोड घेण्यात यावा. शिवजयंतीचा ही मार्ग यात घेण्यात यावा. शिवाजी पुतळा ते भिंगारवाला चौक, शिवम प्लाझा ते बारा तोटी कारंजा ते बंगाल चौकी पर्यत रस्ता घेण्यात यावा शहरातील रस्त्याची चाळण होणार आहे हा जो निधी यासाठी येणार तो इतरत्र वळवू नका रिलायन्स सारखी परिस्थिती निर्माण होवू नये.

**MSEB चे श्रीमती भालेराव** :- कोठला ते हवेली, रामचंद्र खुंट हा राहिलेला मार्ग कव्हर करू शकतो. हया निधीतील काम फेब्रुवारी पर्यत झाले पाहिजे सर्व काम पुर्ण करताना नगरकरांची गैरसोय होणार नाही याची महावितरणकडून खबरदारी घेण्यात येईल.

**मा.श्री. सुवेंद्र गांधी** :- इतर रस्ते हा शब्द वगळून खोदलेले रस्तेच घेण्यात यावे.

**मा.श्री. अभिषेक कळमकर** :- मा.केंद्राकडून निधी मिळालेला आहे. गणेशोत्सव काळात सावेडी उपनगरात १३ मंडळे होती. या विसर्जन मार्गाचा देखील समावेश करावा. हा निधी रूपये १ कोटी ६६ लाख आला आहे. रू.४० लाख पॅचिंगसाठी वापरणार आहे. अमरधाम परिसरातील रस्त्याचा देखील यामध्ये समावेश करण्यात यावा.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.सातपुते** :- ५१ कि.मी. मागणी केली आता १३ कि.मी. परवानगी मागीतली आहे.

**मा.श्री.अभिषेक कळकमर** :- अमरधामजवळ लोंढे केबल, आयुर्वेद , दिल्लीगेट , सावेडी विसर्जन मिरवणुकचा समावेश करावा.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री. सातपुते** :- एमएसईबी. विभागाला सदर बाबत कळविण्यांत येईल.

**डॉ.श्री.सागर बोरुडे** :- नागापूर , बोल्हेगांव विसर्जन मिरवणुक मार्ग घ्या.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री. सातपुते** :- आपण सदर मागणी एमएसईबी ला कळवू

**मा.श्री.अनिल शिंदे** :- गिरवले मामा व सचिन जाधव यांनी सुचवलेले रस्ते घेण्यात यावे शिवजयंतीचा मार्ग समाविष्ट करावा. फेज-२ ची लाईन टाकून रू.१ कोटी २५ लाखातून हे रस्ते घेण्यात यावे हे पैसे इतरत्र वर्ग करु नये. MSEB च्या लाईनसाठी वापरण्यात याव्यात.विषय मंजूर करण्यात यावा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे** :- MSEB चे अधिकारी उपस्थित आहेत त्या जबाबदार अधिकारी आहेत. घरकुल योजनेचा प्रश्न त्यांच्या समोर मांडा ?

**श्री.मेहेत्रे** :-लाईट व डीपी कनेक्शन बाबत एमएसईबी ला प्रस्ताव दिलेला आहे.

**MSEB चे श्रीमती भालेराव** :- घरकुल योजना काटवन खंडोबा, मोकळा सर्व्हे केला सर्व्हीस वायर टाकून कनेक्शन घ्यावे लागतील.काल ४० कोटेशन इश्यु केले १०० ची एक DP प्रपोज केली आहे. ८ दिवसात काम पुर्ण होईल.

**मा.श्री. कैलास गिरवले** :- शहरातून एक राष्ट्रीय महामार्ग जाणार आहे भूमीगत जलवाहिन्या गटर्स यासंदर्भात काही मिटींग वगैरे झाली का

**शहर अभियंता** :- अध्यापपर्यत उत्तर आलेले नाही

**मा. महापौर साहेब** :- ऑफिस रिपोर्ट व सभेत झालेल्या चर्चेनुसार मा.सदस्य यांनी सुचविल्यानुसार रस्ते घेण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. विषय मंजूर.

**---*---**

**ठराव** :-

ऑफिस रिपोर्ट व सभेत झालेल्या चर्चेनुसार शहरातील गणपती विसर्जन मिरवणुक मार्गावरील केबल टाकणेकरीता रस्ते खोदाई करणेस परवानगी देण्यात येत आहे. भविष्यात केबल टाकलेले रस्ते रूंदीकरण झाल्यास एमएसईबी च्या केबल स्थलांतरीत करण्याचे काम करणेस कंपनी तयार नसल्याने ती अट रद्द करून भविष्यात केबल स्थलांतरीत करणेचे काम मनपा स्तरावर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच नियमानुसार करार करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना देण्यात येत आहे.

तसेच मा.सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे सध्या मंजूर कामामध्ये छत्रपती शिवजयंती मार्ग, मोहरम मार्ग,गणेश विसर्जन मार्ग तसेच मानाचा गणपती विसर्जन मार्ग , सावेडी गणेश विसर्जन मार्ग, बोल्हेगांव नागापूर विसर्जन मार्ग हे काम अंतभूर्त करणे बाबत एमएसईबीला कळविण्यांत यावे. तसेच यापुढे एमएसईबी चे मंडळास शहरात इतर ठिकाणी केबल टाकण्यास परवानगी लागल्यास मा.आयुक्त यांना वरिल धोरणानुसार परवानगी बाबतचे अधिकार देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**सुचक** :- मा.श्री.सचिन तुकाराम जाधव

**अनुमोदन :**-मा.श्री.अनिल माधवराव शिंदे

ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ३७** **दिनांक : २२ / १२ /२०१६.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** घनकचरा व्यवस्थापन विभागास शहरातील कचरा संकलनासाठी व वाहतुकी कामी नवीन वाहने खरेदी करणेबाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- दिनांक ०१/०९/२०१६ रोजी मा.आयुक्त सो यांचे कक्षात झालेल्या मिटींग मधील सुचने अन्वये.

विनंती अहवाल देण्यांत येतो की, शहराची सन २०११ चे जणगणनेनुसार अंदाजे ४ लाखापर्यंत आहे. प्रति व्यक्ती प्रतिदिन ३१० ग्रॅम कचरा निर्मीती करत असल्याने व व्यापार, उद्योग धंद्यापासुन, वर्षभर चालणारे सार्व. उत्सव (गणपती, दसरा, मोहरम, नाताळ, दिपावली) तसेच दरमासिक सण, फेस्टीव्हल, प्रदर्शन इ. पासून शहरात अंदाजे १२५ ते १५० मे.टन कच-याची निर्मिती होते.

वर नमुद केल्याप्रमाणे दैनंदिन निर्माण होणारा कचरा दररोज म्यु.पल उपलब्ध वाहनाव्दारे घरोघर, रस्ते सफाई, सार्व. कचरा कुंडीवरुन भरणे अशा प्रकारे बुरुडगांव व सावेडी (दि.२३/०८/२०१६ पासून कार्यान्वीत) कचरा डेपोवर डंपर व्दारे, ट्रॅक्टर, घंटागाडी व्दारे वाहतूक केली जाते.

दररोज निर्माण होणारा कचरा घरोघर संकलन व वाहतूक करणेकामी दिवसातून फक्त एक वेळ संकलन व वाहतूक केली जाते. त्यामुळे कचरा निर्माण करणारे व्यवसायीक, घरगुती उत्सव यांचा निर्माण होणारा कचरा दिवस-रात्र कोणत्याही वेळेत जमा होत असतो.

अशा परिस्थितीत उपलब्ध असणारे वाहने अपूरी पडतात. तसेच जे वाहने उपलब्ध आहेत त्यामधील दररोज कोणत्या ना-कोणत्या कारणास्तव नादुरुस्ती किंवा इतर कारणाने कचरा संकलन व वाहतुकीसाठी उपलब्ध होत नाहीत. आणि झालेच तर कचरा डेपो चे अंतर संकलनाकामी लागणारा वेळ, कचरा उचलणेकामी आवश्यक असणारे मनुष्यबळ व यंत्रणा यामुळे दैनंदिन अडचणी निर्माण होतात. त्यामुळे सद्यस्थितीत निर्माण होणारा कचरा टाकावू पदार्थ मटेरियल यांची वाहतुक पूर्ण असलेने होवू शकत नाही.

शहराची सध्याची भौगोलिक संरचना व क्षेत्रफळ, लोकसंख्या, दररोज शहरात ये-जा करणारे (Hoting Population) यांचा सद्यस्थितीत व भविष्याची होणारी वाढ लक्षात घेता घनकचरा व्यवस्थापन विभागास सद्यस्थितीत उपलब्ध वाहना व्यतिरिक्त जादा वाहनांची आवश्यकता असते. तसेच मनपा प्रशासकीय कामकाजाचे दृष्टीने ४ झोन निहाय वाहने उपलब्ध करुन दिल्यास सद्यस्थितीत व यापुढे निर्माण होणारा कचरा संकलन-वाहतुक करणे सोईचे होईल.

सध्याच्या वाहनांची उपलब्धता पहाता घनकचरा व्यवस्थापन विभागास खाली नमूद केल्या प्रमाणे वाहनांची आवश्यकता आहे. तरी तातडीने सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार वाहने खरेदी करणे उचीत वाटते. माहितीस व पुढील आदेशार्थ सादर.

यावर सीएसआय यांचा अभिप्राय की, रिपोर्ट प्रमाणे कार्यवाहीकरीता आदेशार्थ.

यावर घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ.श्री.पैठणकर यांचा अभिप्राय की, १४ व्या वित्त आयोगातून प्राप्त ६,७८,१३,४२५/- निधीपैकी ४ कोटी रुपयांची सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे

अतिरिक्त वाहने मोटार व्हेईकल विभागा मार्फत खरेदीस मंजूरीस्तव सादर तसेच उर्वरीत रक्कम घनकच-याच्या इतर कामांसाठी जसे बिले, जनजागृती इ. खर्चास मंजूरीस्तव.

यावर उपायुक्त (कर) श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, घनकचरा संकलन व वाहतुकीला देयके देणे इ.समाविष्ठ करणेत यावी.

यावर अतिरिक्त आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, मुलेप, यांचे अभिप्रायासह सादर करावे.

यावर मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे यांचा अभिप्राय की, विभागाने प्रत्यक्ष खर्च कीती येणार आहे हे नमूद केले असल्याने आवश्यक ती वाहने खरेदी करणेस व घनकचरा व्यवस्थापन करणेस आवश्यक असणा-या इतर बाबींसाठीही खर्च करणेस मंजूरी घेणेस प्रस्तावित करणे योग्य होईल आदेशार्थ.

यावर मुख्यलेखापरीक्षक श्री.अनारसे यांचा अभिप्राय की, उप आरोग्य अधिकारी, मुलेअ यांचे अभिप्रायानुसार व महाराष्ट्र शासन न.वि.वि.शा.नि.क्र.संकिर्ण २०१६/प्र.क्र.३०३/न.वि/३३ दिनांक ३०/०८/२०१६ चे निर्देशनानुसार कार्यवाहीस्तव मा.महासभेपुढे पाठविणेस हरकत नाही.

यावर उपायुक्त (कर) श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, सोबतच्या टिपणीनुसार रक्कम रु.६.७८ कोटीचे सविस्तर नियोजन प्रत्येक वाहन खरेदीची प्रचलित किंमत, वाहतुक, संकलन ठेकेदार बील इ. सह सविस्तर खर्चाच्या नियोजनासह सादर करणे.

यावर घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचेकडुन फेरसादर रिपोर्ट की, उपरोक्त विषयानुसार मा.उपायुक्त (कर) यांच्या दिनांक ०७/१०/२०१६ रोजीच्या आदेशानुसार खालील प्रमाणे निधीबाबत नियोजन करण्यास उचित वाटते.

| अ.क्र. | उपलब्ध वाहन प्रकार | संख्या | अ.क्र. | आवश्यक वाहन प्रकार | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | टाटा ४०७ घंटागाडी | १५ | १ | सेप्टीक टँक सक्शन व जेटींग | ०१ |
| २ | टाटा एसी घंटागाडी | १५ | २ | फिरते शौचालय १० सीट | ०१ |
| ३ | टाटा ७०९ कंटेनर प्लेसर सिंगल ४.५ | ०२ | ३ | ट्रॅक्टर डोजर | ०३ |
| ४ | टाटा ११०९ कंटेनर डबल प्लेसर डबल २.५ | ०२ | ४ | कंटेनर पेटी ४.५ क्षमतेचे | २५ |
| ५ | ट्रॅक्टर इंजिन | ०९ | ५ | कंटेनर पेटी २.५ क्षमतेचे | ०५ |
| ६ | ट्रॅक्टर ट्रॉली | १५ | ६ | मुळ जेट प्रेशर पँगो मशीन | ०२ |
| ७ | सेप्टीक टँक ट्रॅक्टर ट्रॉलीसह | ०१ | -- | --- | -- |

प्राप्त निधीतुन खालील प्रमाणे वाहने, कचरा संकलन व वाहतुक करणे नियुक्त ठेकेदारांचे बिल आदाई, जनजागृती करणे, वैयक्तीक शौचालय करीता हिस्सा रक्कम ठेवणे इ. बाबी करीता खालील प्रमाणे नियोजन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | आवश्यक वाहन प्रकार | अंदाजित रक्कम प्रति वाहन नग | वाहन संख्या | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | कॉम्पॅक्टर १२ टन क्षमतेचे | ३५,००,०००/- | ०३ | १,०५,००,०००/- |
| २ | कंटेनर पेटी ४.५ क्षमतेचे | ६५,०००/- | १२० | ७८,००,०००/- |

| अ.क्र. | आवश्यक वाहन प्रकार | अंदाजित रक्कम प्रति वाहन नग | वाहन संख्या | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ३ | टाटा ४०७ घंटागाडी चौकोनी हौदा | ८,००,०००/- | २० | १,६०,००,०००/- |
| ४ | सेप्टीक टँक सक्शन व जेटींग मशिन | १५,००,०००/- | ०३ | ४५,००,०००/- |
| ५ | फिरते शौचालय १० सिटचे ५ पुरुष व ५ स्त्री | ५,००,०००/- | ०३ | १५,००,०००/- |
| ६ | जेसीबी मशीन (Excavetor) | २५,००,०००/- | ०२ | ५०,००,०००/- |
| ७ | पोकलॅन मशीन Ex-२१० | ३०,००,०००/- | ०२ | ६०,००,०००/- |
| ८ | वजन काटा मशीन (Weigh Bride) | ५,००,०००/- | ०२ | १०,००,०००/- |
| ९ | घनकचरा संकलन व वाहतुकीच्या खर्चा पोटी (वाहन भाडे, वाहन चालक, कंत्राटी मजुर व इतर खर्च कामी) | -- | -- | ५०,००,०००/- |
| १० | घनकचरा वर्गीकरणकामी नागरिकांमध्ये जनजागृती करणेकामी | -- | -- | १०,००,०००/- |
| ११ | वैयक्तिक शौचालय लाभार्थ्यांना अनुदान उपलब्ध करुन देणे कामी | अंदाजे ३००० लाभार्थ्यां करीता | प्रति लाभार्थी ५०००/- प्रमाणे | १,५०,००,०००/- |
| | | | **एकुण -** | **७,३३,००,०००/-** |

सदर बाबत वरील बाबी करीता १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधी मधुन तरतुद करणे करीता प्रस्ताव मान्यतेस्तव मा.महासभेकडेस सादर करणे आवश्यक आहे. तरी वरील बाबींचा १४ व्या वित्त आयोगातील प्राप्त अनुदानामधुन एकुण रक्कम रुपये ७,३३,००,०००/- तरतुद करणे करीता प्रस्ताव मा.महासभेकडेस सादर करणे करीता सविनय सादर.

यावर उपायुक्त (कर) श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, यथा प्रस्तावितनुसार १४ वा वित्त आयोगाच्या शिफारशीनूसार प्राप्त घनकचरा व्यवस्थापन विभागाचे घटकांकरीता ५०% प्रमाणे सन २०१६-२०१७ या वर्षाकरीता रु.६.७८ कोटीचे नियोजन करणे आवश्यक आहे. धोरणात्मक बाब असलेने खर्चाचे नियोजनकरीता मे.महासभेकडेस प्रस्ताव सादर करणेकरीता मे आदेशार्थ सादर.

यावर अतिरिक्त आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, नगरविकास विभाग, शासन निर्णय दि.३ मार्च २०१६ व दिनांक १८ फेब्रुवारी २०१६ संचिकेमध्ये जोडलेले नाहीत. तरी मार्गदर्शक सूचनाप्रमाणे कायम स्वरुपी भांडवली गुंतवणूक करणेकामी धोरणात्मक निर्णय घेणे उचित होईल. तरी रक्कम रु.६.७८ चे अधिन राहून निर्णय घेणेकरीता मा.महासभेकडे पाठविणे करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

---*---

**चर्चा :-**

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** वृत्तपत्रात बातमी आली आहे. ९० लाख रुपये कंटेनर घेण्यासाठी वर्ग केले. २० कंटेनर बेग पटांगणात येवून पडले त्यांची किंमत ४५ लाख रुपये आहे.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** अशा स्वरुपाचा कुठलाही निधी वर्ग केलेला नाही.

**मा.श्री.सचिन जाधव :-** बील काढण्यासाठी रक्कम वर्ग केली नाही.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** कचरा संकलनासाठी जी तरतुद ५० लाख होती त्यासाठी ५० लाख वर्ग केले.

**मा.श्री.सचिन जाधव :-** मा.श्री.गणेश भोसले साहेब यांनी सांगितले होते. १४ व्या वित्त आयोगातून कंटेनर घेण्यासाठी पैसे वर्ग करा. महानगरपालिका फंडातून कंटेनर घेण्यासठी निधी इतर निधी वर्ग करता येत नाही महानगरपालिका फंडातल्या कामासाठी १४ व्या वित्त आयोगातून वर्ग कसे केले घनकचरासाठी टेंडर निघाले नाही. ऑडीटर असे १४ व्या वित्त आयोगातून वर्ग करता येत का त्याला न पाठवता परस्पर कसे वर्ग करता.

**मुख्यलेखापरीक्षक श्री.अनारसे :-** महानगरपालिकेस हा केंद्र शासनाचा निधी वितरीत करतांना मार्गदर्शक सूचना प्राप्त होत्या. ५० टक्के सर्वसाधारण व ५० टक्के घनकचरा व्यवस्थापना साठी खर्च करता येतो.मा.महासभा व मा.स्थायी समितीच्या मंजूरीने २०० कंटेनरसाठी टेंडर प्रक्रीया झाली. उपलब्ध अनुदानाचे अनुषंगाने २० कंटेनर बसविले व उरलेले ७० कंटेनर महानगरपालिका फंडातून प्रस्तावित आहेत. हा लेखाशिर्ष वेगवेगळा असतो, एखादी वस्तू खरेदीला ज्या लेखाशिर्षातून प्रमाण झाले. त्यातुन देयके अदा केली जातात. एखादी वस्तू खरेदी, वस्तू सेवा ई निविदे पूर्वी ज्या लेखा शिर्षाखाली मंजूरी दिली जाते. त्याच लेखाशिर्षाखाली देयके अदा केली जातात.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** २०० कंटेनरचा आपण ठराव केला महानगरपालिका फंडातून ७० कंटेनर कसे प्रस्तावित केले. ज्यावेळेस एखाद्या ठरावात ५० टक्के निधी खर्च करणे बंधनकारक असतांना तुम्ही का नाही करत ?

**मुख्यलेखापरीक्षक श्री.अनारसे :-** २० आणि ७० कंटेनर संबंधित विभाग प्रमुखा मार्फत विषय प्रस्तावीत केला जातो.

**मा.श्री.सचिन जाधव :-** १४ व्या वित्त आयोगातून घेता येतील का ?

**मुख्यलेखापरीक्षक श्री.अनारसे :-** १४ व्या वित्त आयोगातून ७० कंटेनर घेता येतील. मनपा निधी व घनकचरा साठीचा निधी दोन्ही निधी उद्दीष्टालाच आहेत. काम वर्ग करावा लागेल. निधी वर्ग करता येणार नाही.

**मा.श्री.सचिन जाधव :-** २५ लाखाचे पुढे तुम्हाला मंजूरी देता येते का ? कंटेनर आमच्या घरी जाणार नाही. महानगरपालिका फंडात पैसे नाही त्याकरीता भोसले साहेबांनी निधी वर्ग करण्याची मागणी केली ते न करता परस्पर ठेकेदाराला देण्यासाठी वर्ग केले.

**मुख्यलेखापरीक्षक श्री.अनारसे :-** महानगरपालिका फंडात १४ व्या वित्त आयोगातून लागू करता येत नाही. हिश्यापोटी निधी वर्ग करता येतो १०० टक्के निधीतून वर्ग करता येत नाही.

**मा.श्री.सचिन जाधव :-** एकाच कामाचे भाग पाडता येतात का ?

**मुख्यलेखापरीक्षक श्री.अनारसे :-** कामाची विभागणी करण्यावर बंदी आहे.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** मंजूरी देण्या अगोदर दुरुस्ती करावी. ७० कंटेनर १४ व्या वित्त आयोगातुन खरेदी करावेत. पोकलेन २ पावसाळयासाठी वापरतात. १ हप्ता जेसीबी भाडयाने घेता येईल. यात निश्चीत बदल करावा. २० कंटेनर कुठे देणार याकडे आपण लक्ष द्यावे. एकदा महासभेत ठराव झाल्यानंतर आपणावर ही वेळ येते, फेरबदल त्यात करु नये. शहरातील नागरिकांवर अन्याय आहे. कच-याचे शहर आहे अशी ओळख होवू नये याकडे गांभीर्याने लक्ष द्या.

**मा.श्री.सचिन जाधव :-** ७० कंटेनर , १४ व्या वित्त आयोगातून घेता येतील का ?

**मुख्यलेखापरीक्षक श्री.अनारसे :-** ९० लाख हा निधी वर्ग करता येणार नाही. उद्दीष्ट एकच असल्याने ७० कंटेनर खरेदीचे काम वर्ग करता येईल. नविन कंटेनर १४ व्या वित्त आयोगातून खरेदी करता येईल.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब** :- २० कंटेनर १३ व्या वित्त आयोगातून खरेदी करणे बाबत निविदा निघाली आहे. दुसरी निविदा महानगरपालिका निधीतून होती. ज्या लेखाशिर्षातुन निविदा काढली. त्याची तांत्रिक मान्यता प्रशासकीय मान्यता घेतली. प्रशासकीय संकेतानुसार त्याच लेखाशिर्षातुन संपवणे आवश्यक आहे. आपण कंटेनर आल्यानंतर बील अदा करणार. डिसेंबर ते जानेवारीत काही निधी जमा होणार आहे. महानगरपालिका निधीतूनच शेयर केलेले योग्य राहील. आपण १४ व्या वित्त आयोगाच्या पूर्वीच्या हप्त्यातुन १ कोटी कचरा वाहतुकीसाठी ठेवले होते. रू. १ कोटी १४ व्या वित्त आयोगाचे निधीतून वर्ग करण्यास जी.बी. ने मान्यता दिली. दिवाळीच्या वेळेत ठेकेदाराने काम बंद केले होते. त्यामुळे कच-याची उचल झाली नाही अशावेळी आपत्काल्रीन परिस्थिती उदभवू नये याकरिता १४ व्या वित्त आयोगातून ५० लाख तात्पुरते वर्ग केले. परत १४ व्या वित्त आयोगात पुन्हा रक्कम वर्ग करणार आहोत.

**मा.श्री.सचिन जाधव :-** १० हजाराचे काम ठेकेदार करत नाही. ४५ लाखाचे काम कोण करील.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब :-** १ कोटीतून ५० लाख आपत्कालीन परिस्थितीतून वर्ग केले होते. ४० लाख शिल्लक आहेत. ते वर्ग केल्यावर ५०+४० या ७० कंटेनरचे १ कोटी ४० लाख महानगरपालिका निधीतून देता येतील. या ठेकेदाराने कंटेनर पुरवावे. बील अदा करणेसाठी जानेवारी उजाडणार आहे.

**मा.श्री.सचिन जाधव :-** २१० कंटेनरसाठी महासभेने मंजूरी दिली. ७० कंटेनरसाठी १४ व्या वित्त आयोगातून तात्पुरते वापरण्यासाठी मंजूरी द्या.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब :-** त्या ठेकेदाराने कंटेनर पुरवावे. बिल देण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** १४ व्या वित्त आयोगाचेच का खर्च केला.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब :-** आपत्कालीन परिस्थिती असल्याने वर्ग केले. पुन्हा जमा करणार आहोत. २० कंटेनर १३ व्या वित्त आयोगातुन घेतले. त्यांनी ७० कंटेनर पुरवावेत त्याचे पैसे देणार. उरलेले २०० कंटेनर पैकी ११० घेण्यासाठी ६ कोटी ७८ लाखाच्या प्रस्तावामध्ये प्रस्तावित आहे. ५० लाख पुर्वीचे वर्ग करु. त्यातून पुन्हा निविदा मागवू.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** आता करंट निधी सक्शन मध्ये तो काम करणार का ?

**मा.श्री.सचिन जाधव :-** जे जे अधिकारी असतील त्यांची जबाबदारी निश्चीत करा. अशा प्रकारे राज्य व केंद्र शासनाचा निधी वर्ग करता येत नाही. यातही कळविले आहे. पैशाचा अपहार झालेला आहे. ठेकेदारावर कारवाई करा. याबाबत आम्ही शासनाकडे जाणार आहोत.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** १४ व्या वित्त आयोगातून निधी खर्च करण्याचा ठराव होतो. नंतर महानगरपालिका फंडातून वर्ग केले जाते.

**मा.सौ.शारदाताई ढवण :-** कचरा गाडी १० दिवसातून एकदा येते कच-यामुळे डुकरांची समस्या आहे. याचे गांभीर्याने आयुक्तांनी लक्ष द्यावे. कच-याचा व डुकरांचा विषय मार्गी न लावल्यास कचरा व डुकरे महानगरपालिकेत आणली जातील.

**मा.श्री.दिप चव्हाण :-**यामध्ये अनियमितता आलेली आहे. अशा प्रकारे करु नये हा संकेत आहे. एक विषयाला दोन विषय होत नाही. ७० कंटेनर मनपा फंडातून किंवा १४ व्या वित्त आयोगातून घेण्यात यावे. याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा.सौ.शारदाताई ढवण :-** आयुक्त यांनी गांभीर्याने उत्तर द्या.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब :-** ६ कोटी ७८ लाख आताचे व पुर्वीचे एक कोटी महानगरपालिका फंडातून ७० कंटेनर घनकचरा वाहतुकीसाठी खर्च करणार आहोत. आता निर्णय घेतला की परिस्थिती सुधारायला सुरुवात होईल. तुम्ही आमची बाजु ऐकून घेत नाही. प्रशासनाचे दुःख समजावून घेत नाहीत.

**मा.सौ.शारदा ढवण :-** कुत्रे पकडण्याबाबतचा विषय होता. आपण वेगळी उत्तरे दिली.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब :-** सर्व प्रक्रीया सुधारत आहे. कचरा व्यवस्थीत गोळा झाला तर डुक्कर होणार नाही याकरीता हा ठराव होणे महत्वाचे आहे.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** कोणीही नगरसेवक निधीतील कामे घेण्यास तयार नाही. कचरा गोळा करण्यासाठी सावेडी उपनगरात प्रत्येक वॉर्डात एक गाडी आहे.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** वाहनाचे एक बेअरींग व वायसर बदलले जाते. यावर ४१ लाखाचे बील काढले याची चौकशी करा. चार झोनला चार कॉम्पॅक्टर घ्या.

**मा.श्रीमती.सुनिता भिंगारदिवे :-** वाहने कोणत्या प्रभागाला देणार.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब :-** प्रशासनाने तक्ता आपल्या समोर ठेवला यात किरकोळ दुरूस्ती असेल तर ती करुन मंजूरी द्या.

**मा.महापौर साहेब :-** जी वाहने घ्यावयाची आहेत तसेच कंटेनर, इतर साहित्य याबाबत जे आवश्यक आहेत. ते घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** संबंधीत ठेकेदाराकडून ७ महिने आपण कचरा उचलून घेतला. दिवाळीत त्याचे १४ व्या वित्त आयोगातून बील काढले होते. ही तात्पुरती व्यवस्था आहे. ठेकेदाराकडून व्यवस्थेमध्ये अनियमितता होते. उद्देश एकच होता ना. भविष्यात या संदर्भात पुन्हा कचरा संकलनाचे बीला बाबत प्रश्न उपस्थित होवू नये याकरीता संबंधीत ठेकेदाराचे बील अदा करण्यासाठी मनपा फंड किंवा १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून देण्यासाठी तरतुद करण्यांत यावी. संकलीत कराचे उत्पन्नातून रक्कम जमा झाली. वाहनाच्या दुरुस्तीसाठी ७०० रुपयांसाठी वाहने बंद असतात. घनकच-या अंतर्गत

गाडया घ्यायच्या मग मेंटेनन्सला १४ व्या वित्त आयोगातून ५.५० लाख शिल्लक ठेवा. रिप्रोप्रिएशन केंव्हा करतो.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** रिप्रोप्रिएशन करण्याचे काम चालू आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- ९० लाख रू. वर्ग करा. घनकचरा अंतर्गत ठेकेदाराचे बील १४ व्या वित्त आयोगातून खर्च केला. मनपा फंड व जनरल फंडामध्ये सुधारणा करावी लागेल लेखाशिर्ष नविन करता येईल का ? ऑडीट पॉईंट येवू शकतो. घनकच-याचे बील अदा करा. वाहने कमी करा. जेसीबी व नाले सफाईवर बुरुडगांव डेपो १ मशिनला १.७५ कोटी रुपये बील अदा केले. एवढया वाहनांवर ड्रायव्हर नाहीत.

**मा.श्री.सचिन जाधव :-** कॅफोंनी या वर्षीचे बजेटचे पुस्तक दिले नाही. बजेट पुस्तक छापून आले नाही. संबंधितांचे बील दिलेले नाही.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** एका ठेकेदाराचे उपचारासाठी ३-४ लाखाचे बील काढण्यासाठी उपायुक्तांना फोन करतो कॅफोंना फोन करतो तो ठेकेदार पुण्याला ॲडमीट आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** येत्या बजेटमध्ये केंद्र व राज्य शासनाचा निधी वर्ग करावा लागेल. असे लेखाशिर्ष तयार करावे. वेगवेगळया वाहनापोटी खर्च होत आहे. त्यांना या ठरावांतर्गत बीलाची तरतुद करावी लागेल. परत ठेकेदाराने काम बंद केले तर २ तास चर्चा होईल. मार्च मध्ये वसूली होणार नाही. १४ व्या वित्त आयोगातून खर्च करण्या संदर्भात आजच ठराव करा. आता वाहनाचा रेट कमी झाला आहे कंटेनर वाढतील मागच्या रेटमध्येच तो देतो. सध्याचा रेट कमी झालेला आहे.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** आवश्यक नसलेल्या गोष्टी रुलिंग मध्ये घेवू नका.

**मा.महापौर साहेब :-** केडगाव अग्नीशमन विभागासाठी वारंवार वाहनाची मागणी होती. २ वर्ष वाहन नाही. कमी पैसे करत असतील तर केडगांवसाठी १ वाहन घ्या.

**अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :-** १२ लाख १९ हजार सहाशे पंचवीस खर्चाचा प्रस्ताव लेखा विभागाकडे पाठविला होता. चेक न निघाल्याने वाहन खरेदी करता आले नाही.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** मी जुनमध्ये आलो. मी आता याबाबत सांगू शकत नाही यापूर्वी चर्चा झालेली नाही.

**उपायुक्त (सा) श्री.चारठाणकर :-** ही संचिका एप्रिलमध्ये लेखा विभागाकडे पाठविली. उद्या दोघांना बोलावून दोन-तीन दिवसात कारवाई केली जाईल. उद्या कॉल करुन चर्चा करु. २०० कंटेनर पैकी २० कंटेनर आले आहेत. ७० कंटेनरचे बील मिळेल का याबाबत ठेकेदाराला संशय आहे. यासाठी मनपा फंडातुन एलबीटी तुन पैसे वर्ग केले जातील.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब :-** ज्या लेखाशिर्षातुन निविदा काढली त्याच लेखाशिर्षातुन रक्कम देण्याची व्यवस्था करु.

**उपायुक्त (सा) श्री.चारठाणकर :-** महासभेचा जो निर्णय होईल त्याचे पालन करणार. ठेकेदारांना रक्कम मिळावा म्हणुन ही व्यवस्था केली.

**मा.श्री.सचिन जाधव :-** ७० कंटेनर खरेदी मनपा निधी किंवा १४ व्या वित्त आयोगाच्या रक्कमेतुन करावे.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** नगरसेवक निधी तील कामांचे देयका बाबत काय झाले.

**उपायुक्त (सा) श्री.चारठाणकर :-** एलबीटी तुन लेखा विभागाकडे वर्ग केली होती. लेखा विभागाकडे अडचण झाली होती त्यामुळे वॉर्ड विकास निधी, नगरसेवक निधी लेखाशिर्षावरील कामांची देयके मार्च २०१७ अखेर अदा केली.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** वैयक्तीक शौचालयाचे लाभार्थ्यांना किती रक्कम दिली.

**प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :-** वैयक्तीक शौचालयासाठी एकुण १७ हजार लाभार्थ्यांना देणार आहोत. तसा ठराव झालेला आहे.

**मा.श्री.वाकळे :-** शासन निर्णयाप्रमाणे रु. १२००० व महासभेने ठराव केल्यानुसार रु.५००० महानगरपालिका निधीतून नव्हे तर १४ व्या वित्त आयोगातून निधी वर्ग करणे बाबत ठराव केला. प्रत्यक्ष बांधुन झाल्यानंतर रु. ५ हजार वर्ग करणार. नविन वाहन घेणार. वाहन चालकाची व्यवस्था कशी करणार.

**मा.अतिरिक्त आयुक्त श्री.वालगुडे साहेब :-** सध्या जसे ठेकेदारामार्फत वाहनचालक आउट सोर्सींग मार्फत घेतो. त्यानुसार चालू राहील. दरम्यानच्या काळात आकृतीबंध मंजूर झाल्यास निविदा काढुन ड्रायव्हर भरती करणार आहोत.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** सेप्टीक टँकच्या गाडया घेवून परत खाजगी ठेकेदाराला देणार का ?

**मा.श्री.अनिल शिंदे :-** महानगरपालिका चालवणार.

**मा.महापौर साहेब :-** महानगरपालिके मार्फत चालविण्यांत येईल. ३ कॉम्पॅक्टरचा समावेश केला आहे. ऑफिस रिपोर्ट व सभागृहात झालेल्या चर्चे नुसार वाहन खरेदी व इतर साहित्य घेण्याबाबत कार्यवाही करण्यांत यावी.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व सभेत झालेल्या चर्चे नुसार घनकचरा व्यवस्थापन विभागास शहरातील कचरा संकलनासाठी व वाहतुकीकामी खालील प्रमाणे नवीन वाहने व साहित्य खरेदी यादी.-

| अ.क्र. | आवश्यक वाहन प्रकार | वाहन संख्या |
|---|---|---|
| १ | गारबेज कॉम्पॅक्टर (४.५ m३ कंटेनर संयुक्तीक)<br>अ) १४ m३ क्षमता (टाटा १६१३ वाहनावरील) १ नग<br>ब) ७ m३ क्षमता (टाटा ११०९ वाहनावरील) २ नग | <br>१ नग<br>२ नग |
| २ | कचरा कंटेनर पेटी ४.५ m३ क्षमतेचे (३ मी.मी.जाडीचे ) | १२० नग |
| ३ | टाटा ४०७ घंटागाडी (एसएफसी ४०७/३१ EX४ SPTC BS IV CABIN TRUCK चौकोनी हौदासह) | २० नग |
| ४ | (टाटा ११०९ चेसीवरील) सेप्टीक टँक सक्शन व जेटींग मशिन | १ नग |
| ५ | (FRP Urinal ) फिरते शौचालय १० सिटचे ५ पुरुष व ५ स्त्री ट्रॅक्टर ट्रॉली पध्दतीचे | २ नग |
| ६ | जेसीबी (JCB) कंपनीचे मशीन (Excavetor) ३dx HTD (७६ HP) With ६ in १ Shovel Loader Bucket | १ नग |

| | | |
|---|---|---|
| ७ | वजन काटा मशीन (Weigh Bride) Pitless Double Ended Sharbim IT Indicator ( ७"X३ Meter चे) क्षमता ४० टन, (अंदाजीत रक्कम रुपये प्रत्येकी १० लक्ष) | २ नग |
| ८ | टाटा एसीई (१.८M३ ACE Hopper Tipper Bs ४) | १० नग |
| ९ | डस्टबीन perforated GI Perforated Sheet (१.५' x२' ) साईजचे | १५५० नग |
| १० | LPK १६१३ Tipper BS iv ८.५ cu m Under DGS&D RC No ६८३ (Model SR No २६)(डंपर कचरा वाहतुकीसाठी) | १ नग |
| ११ | बुरूडगाव स.नं. ३४ व सावेडी स.न. २८९ कचरा डेपो या ठिकाणी वॉचमन , केबीन उभारणे | २ नग |

वरिल प्रमाणे वाहने व साहित्य १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतुन खरेदी करण्यांस ही सभा मान्यता देत आहे तसेच याच निधीतुन वैयक्तिक शौचालय लाभार्थ्यांना अनुदान उपलब्ध करुन देणे कामी - रक्कम रु. १ कोटी, घनकचरा वर्गीकरणकामी नागरिकांमध्ये जनजागृती करणेकामी - रक्कम रु. १० लक्षची तरतुद करण्यांस ही सभा मान्यता देत आहे. वरील प्रमाणे येणा-या सर्व खर्चास व खरेदी करणेस ही सभा मान्यता देत आहे.

याबाबत नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**सुचक** :- मा.श्री.सचिन तुकाराम जाधव,

**अनुमोदक :-** मा.श्री.अनिल माधवराव शिंदे,

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ३८** **दिनांक : २२ / १२ /२०१६.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मौजे भिंगार स.अ नं. ३४३/१ पैकी जागेवरील मंजूर विकास आराखडयातील आ.क्र. १२४ , प्राथमिक शाळा व क्रिडांगणचे आरक्षण रद्द करणेबाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- श्री.चंद्रकांत बाबुराव गाडे व इतर यांचा दिनांक १९/०७/२०१६ रोजीचा अर्ज.

अहमदनगर शहराच्या वाढीव हद्दीच्या मंजुर विकास योजनेमध्ये मौजे भिंगार स.नं.३४३/१ पैकी जागेवर आरक्षण क्र.१२४, प्राथमिक शाळा व क्रीडांगणचे आरक्षण रद्द करुन रहिवास विभागात समाविष्ठ करणेबाबत १) श्री.चंद्रकांत बाबुराव गाडे २) श्री.रमाकांत माधवराव गाडे ३) श्री.संजय बाबुराव गाडे ४) मनिष बन्सीलाल सहानी यांनी अर्ज सादर केलेला आहे.

अहमदनगर शहराच्या वाढीव हद्दीच्या विकास योजनेस शासनाने एप्रिल २०१२ मध्ये मंजुर केलेला असुन सदर मंजुर विकास योजनेमध्ये मौजे भिंगार सनं.३४३/१ पैकी जागेवर आरक्षण क्र.१२४ ने ०.४२ आर क्षेत्रावर प्राथमिक शाळा व क्रीडांगण म्हणुन दर्शविलेली आहे. अर्जदार यांनी सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने जागेची समक्ष पाहणी केली असता विषयांकित जागा मौजे भिंगार स.नं.३४३/१ या जागेच्या रेखांकनास मा.सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांचेकडील पत्र क्र.४४० दिनांक २४/०२/१९८४ ने बाबुराव यशवंत गाडे व माधवराव यशवंत गाडे या नावे मंजुर करण्यात आलेला आहे. त्यावर मा.उपविभागीय अधिकारी, नगरभाग, अहमदनगर यांचेकडील पत्र क्र.एनएएसआर/३९/८३ दिनांक २७/०३/१९८४ ने बिनशेती आदेश झालेला आहे.

तद्नंतर रेखांकनातील भुखंडाची विक्री होवुन संबंधित प्राधिकरणांकडुन भुखंड क्र.५१,५२,५३, ५४ व ६३,६४,६५,६६ यामध्ये दिनांक ३०/१२/१९९६ ने तत्कालीन ग्रामपंचायत कडुन बांधकामास परवानगी घेतली असल्याचे दिसुन येते. तसेच भुखंड क्र.६९ मध्ये कार्यालयाचा परवाना क्र.४१४ दिनांक ३१/१०/२००७ अन्वये बांधकामास परवानगी देण्यात आले असल्याचे दिसुन येते. विकास योजनेमध्ये भिंगार स.नं.३४३/१ या जागेच्या मंजुर रेखांकनातील भुखंड क्र.४८,४९,५०,५१,५२, ५३,५४,६३ ते ७३ वर आरक्षण क्र.१२४ प्राथमिक शाळा व क्रीडांगण म्हणुन आरक्षित केलेली आहे. परंतु सदरचे भुखंड खाजगी मालकीचे असल्याचे उता-यावरुन दिसुन येतात. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर कधीही शाळा अस्तीत्वात नव्हती व आजही नाही. त्याचप्रमाणे सदर भागाच्या मंजुर विकास आराखडयामध्ये विषयांकित जागेपासुन १५० मी. अंतरावर विद्यमान प्राथमिक शाळा दर्शविलेली असुन या ठिकाणी प्रत्यक्ष जागेवर यशवंत माध्यमिक स्कुल, मुकुंदनगर व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, फकीरवाडा डॉ.जाकीर हुसेन प्राथमिक शाळा, संत विवेकानंद इंग्लिश स्कुल, इक्रा हायस्कुल इत्यादी. विद्यमान शाळा चालु अवस्थेत आहेत.

अर्जदार यांचे अर्जावरुन सादर केलेल्या कागदपत्रे/पुरावे व प्रत्यक्ष जागेवरील वर नमुद सद्यपरिस्थिती पहाता अर्जदार यांच्या मागणीनुसार आरक्षण रद्द करुन रहिवास विभागात समाविष्ठ करणेच्या फेरबदलाच्या विषयासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याकरीता या कलमातील तरतुदी प्रमाणे प्रथम या विषयाचा धोरणात्मक मंजुरीचा ठराव पारीत होणे आवश्यक असल्याने सदर फेरबदलाच्या प्रस्तावास

तत्वत: मंजुरी मिळणे व त्याप्रमाणे आवश्यक ती वैधानिक कार्यवाही पार पाडलेनंतर शासनाकडे पुढील कार्यवाही करणेसाठी सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करणेस पुढील आदेशार्थ सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त श्री.विलास वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, उपरोक्त अहवालानुसार धोरणात्मक निर्णयाकरीता मा.महासभेकडे सादर.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा. महासभेपुढे ठेवा.

**चर्चा :-**

**मा.श्री. संजय घुले :-** हा विषय सन्माननीय सदस्य योगीराज गाडे यांचेशी संबंधीत असल्याने त्यांनी सभा त्याग करावा. मी सन्माननीय सदस्य म्हणून त्यांना विनंती करतो.

**मा.श्री. कुमार वाकळे :-** या प्रापर्टीवर बिल्डींग वगैरे आहे.

**अभियंता श्री.बल्लाळ :-** ले-आउट मंजूर होवून बिगर शेती होवून १० प्लॉटवर ग्रामपंचायत असतांना बांधकाम परवानगी दिली आहे. सन २००७ ला हा डी.पी.प्लॅन तयार केला २०१२ ला मा.शासनाने मंजूर केला. आता त्यांच्या लक्षात आले की आरक्षण पडलेले आहे. त्यावेळी लक्षात आले नाही.

**मा.श्री. कुमार वाकळे :-** इतर शेतक-यांचे आरक्षण उठवू शकतो का ?

**अभियंता श्री.बल्लाळ :-** सभेचा अधिकार आहे. त्यानंतर शासनाचा अधिकार आहे. विषय महासभेत घेण्याचे अधिकार मा.महापौर यांचे आहेत. व विषय मंजूरीचे अधिकार महासभेचे आहेत.

**मा.श्री. स्वप्नील शिंदे :-** इतराचे असे विषय आले तर मा.महापौर रुलींग देतील का. सर्व्हे नंबर १२४ आरक्षणावर प्रत्यक्ष जागेवर घरे आहेत. ले- आउट मंजूर आहे बिगर शेती झालेली आहे त्या शेतक-यांवर अन्यायच होतो.

**मा.श्री. कुमार वाकळे :-** महानगरपालिकेत जागा आली त्यानंतरच आरक्षण टाकले का हे प्रकरण जसे फास्ट होते तसे इतरांचे झाले पाहिजे. मी तुम्हाला वस्ती दाखवतो त्यावर निर्णय देणार का ? आपण आरक्षण कसे टाकले. पिढयान पिढया तीथेच राहतात. समितीच्या आरक्षाणामुळे गोरगरीब मेले. इतर लोकांकडे तिच उपजिविका होती. आरक्षण टाकतांना एखाद्या क्षेत्राचा विचार करावा. आरक्षण टाकतांना क्षेत्राचा व आजुबाजुच्या वस्तीचा विचार केला पाहीजे. मागील सभेत सावेडी, नागापूर, बोल्हेगाव साठी अमरधाम साठी समिती स्थापन करणार होता त्याचे काय झाले.

**अभियंता श्री.बल्लाळ :-** सावेडी भागासाठी जे आरक्षण डी.पी. मध्ये आहे त्या दोन्ही जागा आयुक्तांना दाखवल्या ते लोक जर तयार असतील तर टी.डी.आर. च्या माध्यमातून जागा विकसीत करता येतील. उतारे काढल्यानंतर त्यामध्ये काही प्लॉट खाजगी निघतो. तिथे तात्पुरती तरतुद करुन घ्यावी.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब :-** आपले आरक्षण ११ एकर असल्याने टी.डी.आर. च्या माध्यमातून, काही सक्तीच्या भूसंपादनाचे माध्यमातून प्रायोरिटीने टीडीआर स्वरुपात प्रयत्न करु.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** पैसे देवून काही तरी केले पाहीजे टीडीआर घ्यायला शेतकरी तयार नाहीत.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब :-** ७५% निधी भूसंपादना साठी राखीव ठेवण्यात येतो. त्यातुन तातडीने सक्तीचे भूसंपादन प्रक्रीया हाती घेवू.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** गाडे व साहनी यांचे ज्या पध्दतीने विषय महासभे समोर आले तसे इतरांचे विषय येतील का ?

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब :-** सक्तीने मा. जिल्हाधिकारी यांचे मार्फत भूसंपादन करावे लागेल भू-संपादन प्रक्रीयासाठी १ वर्षाचा कालावधी लागतो. गतीने पाठपुरावा करु अजुन १ एकर खाजगी टी.डी.आर. च्या माध्यमातून दिला तर करता येईल.

**मा.श्रीमती.दिपाली बारस्कर :-** महानगरपालिकेची वडगांव विहिरीजवळ जागा आहे. तेथे करता येईल.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब :-** तपासून घेवू.

**मा.श्रीमती.नसीम शेख :-** मुकुंदनगर भागातील मुलांनी क्रीडांगणात खेळायचे नाही का ? यामध्ये कोणाचा स्वार्थ आहे ते सांगा. आहे किंवा नाही.

**अभियंता श्री.बल्लाळ :-** स्वार्थ म्हणता येणार नाही. ते राहतात तेथे आरक्षण पडले आहे.

**मा.श्रीमती.नसीम शेख :-** ५० हजार लोकसंख्ये मागे आरक्षणा बाबत शासनाचे नियम आहेत. क्रीडांगणासाठी आरक्षण दिले जाते. तुम्हाला वाटते का मुस्लीम लोकांनी खेळू नये.

**अभियंता श्री.बल्लाळ :-** आवश्यक असणारी आरक्षणे लोकसंख्येच्या प्रमाणात दिलेले आहे.

**मा.श्रीमती.नसीम शेख :-** दिलेले आरक्षण रद्द करु नये माझा याला विरोध आहे. माझ्या वॉर्डातील मुलांनी खेळून पुढे यावे ही माझी इच्छा आहे. मुलांच्या भावी आयुष्यासाठी मी हा विरोध नोंदवित आहे. उत्कृष्ठ खेळाडू तयार व्हावेत अशी माझी इच्छा आहे.

**अभियंता श्री.बल्लाळ :-** आरक्षण विकसीत होत नसतील तर या परीसरात इतर पाच सहा शाळा कार्यरत आहेत.

**मा.श्रीमती.नसीम शेख :-** मला उत्तर द्या. जातीला घेवूनच आमच्या मुलांना मागे घेता.

**अभियंता श्री.बल्लाळ :-** नगरसचिव विरोध नोंदवून घेतील.

**मा.महापौर साहेब :-** मा.नसीम शेख यांचा विरोध नोंदवून घ्या.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** विकास भाराच्या शिल्लक रक्कमेतुन अमरधामसाठी जेवढे क्षेत्र आवश्यक असते त्यातून घेण्यात यावे.

**मा.श्री.आरीफ शेख :-** मा.आमदार साहेब यांचे पत्राचे वाचन केले. आज दिनांक २२/१२/२०१६ रोजी मा.महासभेमध्ये विषय क्र.३८ घेण्यात आलेला असून या आरक्षण फेरबदलाच्या प्रस्तावामध्ये मंजूर रेखांकनांच्या खुल्या जागेमध्ये १० टक्के बांधकाम मंजुर करता येते. यामध्ये जी धार्मिक स्थळे मनपाच्या खुल्या जागेत आहेत व त्याठिकाणी धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणीकृत संस्था असेल याठिकाणी सामाजिक, सांस्कृतिक , धार्मिक कार्य करित असेल अशा संस्थांना सदरचे भुखंड नाममात्र भाडे तत्वावर या याठिकाणी धार्मिक बांधकामे करण्यासाठी नगररचना विभागाच्या प्रचलित नियमावली नुसार सदर जागेत बांधकामे भुखंडधारकांच्या संमतीने मंजूर करणे बाबतचा फेरबदल प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

**मा.श्री.सचिन जाधव :-** महत्वाचा विषय आहे. याप्रमाणे प्रस्ताव मा.शासनाकडेस पाठविणेस हरकत नाही. विषय मंजूर करण्यांत यावा.

**मा.महापौर साहेब :-** पत्राप्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :-** कुठल्या मेरीट बेसवर हे प्रकरण घेण्यात आले. शाळेसाठी जमीन संपादन करावयाची असेल तर तेथे बांधकाम असलेल्या सर्व घरांचा खर्च देवून फक्त शाळेसाठी वापर करु शकतो. आपल्या आर्थिक परिस्थितीनुसार हे शक्य नाही हेच प्रकरण कसे दिसले. सत्ताधारी पक्षातील एक सन्माननीय सदस्य आहे म्हणुन हे प्रकरण घेण्यात आले का ?

**अभियंता श्री.बल्लाळ :-** आमच्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर वस्तूस्थिती व कागदपत्र तपासून मा.महापौरांकडे प्रस्ताव सादर केला.

**मा.श्री.श्रीपाद छिंदम :-** इतर प्रकरणे नियमात बसत असतील, करता येत असतील तर करु. इथे मंजूरी दिल्यानंतर मंजूरी साठी महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव जातो.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :-** आमचा या विषयाला विरोध नाही. पण असे इतरही प्रकरणे आले तर मंजूरी देणार का ?

**मा.श्री.अनिल शिंदे :-** १,२,३,४ झोन मधील ज्या गरींबावर अन्याय झाला त्यांनी अर्ज करावेत. नगरसचिव विभागामार्फत मा.महापौरांकडे अर्ज सादर झाल्यानंतर निर्णय घेता येईल. विषय मंजूर करण्यांत यावा. याबरोबरच धार्मिक स्थळांबाबतचा फेरबदलाचा प्रस्ताव मा.शासनाकडेस पाठविणेस मान्यता द्यावी.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** ३३० आरक्षण २००७ मध्ये पडले त्यावेळी समितीच्या चुकीतून हे राहीले. कमिटी २००७ मध्ये झाली. १८६ हरकती प्राप्त झाल्या. १२४ नंबरला हरकत आलेली नव्हती. या एका प्रकरणामध्ये समितीचे जे सदस्य होते त्याबाबत सभागृहाला माहिती दिली. १८६ हरकती आल्या हा टेक्नीकल अर्ज आहे. समितीने हे पाहायला पाहीजे होते. त्यावेळी समितीचा ठराव सुध्दा झाला. २०१२ ला मा.शासनाने डी.पी.ला मंजूरी दिली. १९८४ ला बांधकाम मंजूरी मिळाल्यानंतर सध्याचे पेपर पहाता कलम ३७ अंतर्गत हा विषय घेण्यांत आलेला आहे. सभागृहाची मंजूरी घेवून मा.शासनाकडे पाठविणार आहे. असे ३०३ लोक जागृत होतील.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :-** अशा पध्दतीने इतरांचे विषय घेणार का ?

**मा.महापौर साहेब :-** अशा पध्दतीने आले तर घेवू. तसे प्रस्ताव ठेवू. ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यांत येत आहे.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व सभेत झालेल्या चर्चे नुसार मौजे भिंगार स.नं.३४३/१ पैकी जागेवरील मंजूर विकास आराखडयातील आरक्षण क्रमांक १२४ हे आरक्षण वगळून त्याखालील जमीन रहिवास विभागास समाविष्ठ करणेबाबत पुढील कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे. याबाबत वर्तमान पत्रात जाहीरात देणे, हरकती व सुचना मागविणे या कार्यवाहीसह या संदर्भामध्ये पुढील कार्यवाही प्रशासनाच्या स्तरावर पार पाडण्यात यावी व सूचना / हरकती प्राप्त झाल्यास त्यांची सुनावणी घेवून अधिनियमाचे ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी मा.शासनास सादर करण्यासाठी ही सभा मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांना प्राधिकृत करीत आहे. याबाबत नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. पुन्हा सभेपुढे विषय घेण्याची आवश्यकता नाही.

तसेच मा.सदस्य यांनी सभेत दिलेले पत्र व झालेल्या चर्चेनुसार मंजूर रेखांकनातील खुल्या जागेत १०% मर्यादेत सर्व भूधारकांचे संमतीने अनुज्ञेय करावयाचे बांधकामामध्ये धार्मिक स्थळाचा

समावेश करण्याचा फेरबदल प्रस्ताव याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ ची वैयक्तीक कार्यवाही पार पाडून व त्याबाबतच्या सूचना व हरकतीची सुनावणी घेवून त्याचा प्रस्ताव देखील मा.शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

याबाबत नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**सुचक** :- मा.श्री.दिलीप नानाभाउ सातपुते

**अनुमोदक :-** मा.श्री.अनिल माधवराव शिंदे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ३९** **दिनांक : २२ / १२ /२०१६.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सन २०१६-२०१७ साठीचा प्रस्ताव मा.शासनाकडेस प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणे व प्रकल्प सल्लागार संस्था नेमणे बाबतचा प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयास्तव ठेवणे बाबत...

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ : १. शासन निर्णय नगर विकास विभाग क्रमांक नगरो-२०१४/प्र.क्र.११९/नवि-३३ दि.२१-०८-२०१४

२. शासन निर्णय क्रमांक नगरो-२०१५/प्र.क्र.६४/नवि-३३ दिनांक २७ मे २०१६

३. मा. महासभा ठराव क्र.५२ दि.११/०२/२०१५.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट की, महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात नागरी पायाभूत व सामाजिक सुविधा निर्माण करणे व त्यांच्या बळकटीकरणासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अभियानातील प्रकल्प ठराविक काल मर्यादेत पूर्ण व्हावेत यासाठी संदर्भिय पत्र क्र. २ नुसार खालीलप्रमाणे सुधारीत कार्यपध्दती व कालमर्यादा विहित करण्यात आलेली आहे.

२. सदर अभियानाच्या अंमलबजावणीबाबत शासन निर्णय समक्रमांक दिनांक २१.०८.२०१४ च्या परिच्छेद (ग) (१) ते (४) येथे विहित केलेल्या कार्यपध्दतीमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

(१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानामधील मंजूर प्रकल्पांसाठी यापुढे राज्य शासनाच्या अनुज्ञेय हिस्सा तीन हप्त्यात ( प्रत्येकी ३३.३ टक्के ) वितरीत करण्यात येईल. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानातील प्रकल्पांसाठी प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर संबंधित नागरी स्वराज्य संस्थेने १५ दिवसांच्या कालावधीत प्रकल्पाचा अर्थिक आराखडा ( Financial Closure Report ) आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन यांच्या मान्यतेने नगर विकास विभागास सादर करावा. त्यानंतरच सदर प्रकल्पासाठी पहिल्या हप्त्याचा निधी वितरीत करण्यात येईल.

(२) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत मंजूर प्रकल्पास पहिल्या हप्त्याचा निधी वितरीत केल्यानंतर तो हप्ता व स्थानिक स्वराज्य संस्थेचा त्या प्रमाणातील स्वहिस्सा हा एकत्र निधी, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार विहित केलेल्या बॅकामध्ये, स्वतंत्र खाते उघडुन ठेवणे अनिवार्य राहील.

(३) या अभियानांत मंजूर प्रकल्पास पहिल्या हप्त्याचा निधी वितरीत केल्यानंतर एक महीन्याच्या कालावधीत निविदा काढणे व तीन महिन्याच्या कालावधीत कार्यादेश देणे व १०१ व्या दिवसापूर्वी कामाचा प्रत्यक्ष प्रारंभ करणे बंधनकारक राहील. यानुसार कार्यवाही न झाल्यास संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस अशा प्रकल्पासाठी मंजूर केलेला निधी त्यावरील व्याजासह शासनास परत करणे आवश्यक राहील.

(४) या अभियानांत मंजूर प्रकल्पास राज्य शासनाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेस राज्य शासनाचा हिस्सा मंजूर केल्यानंतर त्यामधून खर्च करतांना प्रत्येक टप्प्यावर प्रत्येक देयकामध्ये राज्य शासनाच्या हिश्श्यामधून जेवढी रक्कम प्रदान होणार असेल त्या प्रमाणात संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने स्वहिश्श्याची रक्कम प्रदान करावी. यामुळे अशा योजनेत स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा एकाच वेळी भरण्याची वेळ येणार नाही.

३. महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानातील मंजूर प्रकल्पांसाठी राज्य शासनाने मंजूर केलेला निधी व त्यावर मिळालेले व्याज फक्त त्याच प्रकल्पासाठी वापरता यील व ते अन्य कोणत्याही कामासाठी वळवता किंवा वापरता येणार नाही. अशाप्रकारे मुळ निधी किंवा त्यावरील व्याज कायम स्वरुपी किंवा तात्पुरत्या स्वरुपात अन्यत्र वळविणे ही गंभीर स्वरुपाची अर्थिक अनियमितता मानली जाईल, त्यासाठी संबंधित अधिकारी कारवाईस पात्र ठरतील.

४. महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानामधील प्रकल्प त्या प्रकल्पास पहिल्या हप्त्याच्या निधी वितरणाच्या आदेशात नमूद केलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक राहील. असे प्रकल्प त्या कालामर्यादेत पूर्ण होतील याची संपूर्ण जबाबदारी संबंधित आयुक्त, महानगरपालिका/ मुख्याधिकारी, नगर परिषद यांच्यावर राहील.

५. महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानातील प्रकल्पाच्या सर्व उपांगासाठी एकत्रित निविदा प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत कामाचे तुकडे पाडुन निविदा काढण्यात येवू नयेत. या सूचनेचे उल्लंघन केल्यास ती गंभीर अनियमितता मानली जाईल. निविदा प्रकिया पूर्ण  केल्यानंतर कार्यादेश कार्यादेश उपांगासाठी देता येतील. पाणी पुरवठा प्रकल्पांसाठी शासन परिपत्रक नगर विकास विभाग क्रमांक संकिर्ण-२०१६/ प्र.क्र. २८/नवि-३३ दिनांक १७.०२.२०१६ मधील कार्यपध्दती अवलंबण्यात यावी.

६. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानामधील प्रकल्पाच्या मंजूरीपासून प्रकल्प पूर्ण होईपर्यंत करावयाच्या कार्यवाहीचा कालबध्द कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

**जोडपत्र-१**

| |
|---|
| प्रकल्पास प्रशासकीय मान्यता |
| |
| संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने वित्तीय व्यवस्थेचा आराखडा सादर करणे |
| |
| प्रथम हप्त्याचा निधी वितरीत करणे |
| |
| निविदा प्रसिध्द करणे ( निधी वितरीत झाल्यापासून १ महिन्यात) |
| |
| प्रकल्पाच्या सर्व उपांगासाठी एकत्रित निविदा काढावी तिचे भाग करु नयेत |
| |
| कार्यादेश देणे ( निधी वितरीत झाल्यापासून ३ महिन्यात) [ यानुसार कालमर्यादेत कार्यवाही न झाल्यास कार्यान्वयन यंत्रणेचे काम अन्य यंत्रणेकडे सोपविण्याचा शासनास अधिकार राहील. |
| |

| कामाचा प्रारंभ ( निधी वितरीत झाल्यापासून १०० दिवसात) |
|---|
| |
| प्रथम टप्प्याच्या निधी वितरण आदेशात नमूद केलेल्या कालमर्यादेत काम पूर्ण करणे |
| |
| पाणी पुरवठा प्रकल्पांसाठी दिनांक१७.०२.२०१६ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करणे. |
| |
| काम कालमर्यादेत पूर्ण करण्याची संबंधित आयुक्त/ मुख्याधिकारी यांची राहील |
| |
| प्रकल्पांचे शाश्वत फलित (Permanent Outcome) निश्चित करावे व प्रकल्प पूर्ण होतांना साध्य फलिताचा आढावा घ्यावा. |
| |

७. वरील कालमर्यादेत नमूद कालमर्यादेनुसार निधी वितरीत झाल्यापासून तीन महिन्यात निविदा अंतिम करुन कार्यादेश देण्यात संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था अपयशी ठरल्यास अशा कामासाठी कार्यान्वयन यंत्रणा म्हणून अन्य यंत्रणेची ( सार्वजनिक बांधकाम विभाग / महाराष्ट्र जीवन प्राधिकरण इत्यादी) नियुक्ती करण्याचा अधिकार शासनास राहील. त्यावेळी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचा स्वहिस्सा मात्र त्यांनाच भरावा लागेल. असे नमूद आहे.

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रस्ताव पाठविणेकामी मा. महासभा ठराव क्र.५२ दि.११/०२/२०१५ अन्वये मा. केंद्र शासन, राज्य शासन विविध योजनेच्या माध्यमातून नागरी सुविधेचे दूरगामी प्रकल्प राबविणे कामी अर्थ सहाय्य उपलब्ध करुन देते, तथापि मनपा मा.शासनाक्डुन योजना जाहीर झालेवर त्या संदर्भातील निधीमधून नागरीकांसाठी योजना तयार करते, परंतू या कालावधीमध्ये फार वेळ जातो. परिणामी मा.शासनाच्या सुचनेनुसार योजना राबविणेचा कालबध्द कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडता येत नाही.

याकरिता ऑफिस रिपोर्टनुसार व मा. सदस्य यानी सुचित केल्यानुसार शहरातील विकास योजनेतील महत्वपूर्ण रस्ते, गटर्स तसेच स्ट्रीट लाईट आदी सह इतरही नागरी सुविधेची मोठ्या स्वरुपाची व महत्वपूर्ण विकास कामे करणेस मान्यता प्राप्त आहे.

सन २०१६-१७ या अर्थिक वर्षासाठी ' महाराष्ट्र सुवर्णजयंती अभियान योजना अनुदान' या लेखाशिर्षात रु.७०.०० कोटी व ' महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियान कर्ज (हुडको) या लेखाशिर्षात रु.३०.०० कोटी अशी एकुण रु.१००.०० तरतूद करण्यात आलेली आहे. मनपा हिश्श्याची रक्कम कर्ज रुपाने उभारणेकामी ' हुडको ' कडे प्रस्ताव सादर करणेची कार्यवाही चालू आहे.

विविध योजनांमध्ये आवश्यकतेप्रमाणे कामे करणेसाठी एकुण ३१६ ठिकाणांची यादी तयार करण्यात आलेली आहे, **(सोबत यादी)** तथापि मा. महासभेच्या ठरावाचे अनुषंगाने मे. जगप्रयाग इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. मुंबई, या एजन्सीस कार्यारंभ आदेश देतांना रस्त्यांचा प्राधान्यक्रम ठरवून त्या यादीस प्रशासकीय मान्यता घेवून टप्प्या-टप्प्याने कार्यारंभ आदेश देणेस तत्कालीन मा.आयुक्त, यांनी दि.२४/०३/२०१५ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर योजनेतून रु.१००.०० कोटीचा प्रकल्प अहवाल तयार करणेकामी रस्त्यांचा आवश्यकतेनुसार प्राधान्यक्रम ठरविणे आवश्यक आहे.

तरी महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजना ( सन २०१६-१७) राबविणेकामी रु.१००.०० कोटीचा प्रस्ताव सादर करणेकामी प्रस्तावित यादीमधून करावयाच्या कामांचा प्राधान्यक्रम ठरविणे, त्यानुसार मे. जगप्रयाग इंन्फ्रा. नवी मुंबई, यांना प्रकल्प अहवाल तयार करणेस तसेच सदर प्रकल्पातील कामांसाठी प्रकल्प सल्लागार संस्था नेमणे कामी सदरचा ऑफिस रिपोर्ट मा. महासभेकडेस निर्णयास्तव ठेवणेस आदेशार्थ सविनय सादर.

यावर प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के यांचा अभिप्राय की, महा.सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत सन २०१६-२०१७ करीता सादर करावयाच्या विकास कामांच्या ३१६ ठिकाणांपैकी रक्कम रु.१००.०० कोटी पर्यंतचा प्रस्ताव सादर करणेकामी मा.महासभेच्या मान्यतेने प्राधान्यक्रम ठरविणेची बाब धोरणात्मक असलेने सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मुख्यलेखापरीक्षक श्री.अनारसे यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ प्रमाणे कार्यवाही करणेस व निर्णयास्तव मा.महासभेपुढे ठेवणेस हरकत नाही.

यावर उपायुक्त (कर) श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, यथाप्रस्तावित केलेनूसार व नमूद अ प्रमाणे मा.महासभे समोर पस्ताव सादर करणेस हरकत नाही मे.आदेशार्थ स.सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त श्री.विलास वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालाप्रमाणे व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान राबविण्या बाबत शासन निर्णय दि.२० फेब्रुवारी २०१०, दि.२१ ऑगष्ट २०१४ तसेच दि.२७ मे २०१६ चा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान आदेशात सुधारणा करण्याबाबतचा शासन निर्णय विचारात घेवून मा.महासभा ठराव क्र.५२ दि.११/०२/२०१३ अन्वये दि.१३/०४/२०१५ चे कार्यारंभ आदेश प्रमाणे कामाबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवालासह माहिती फेरसादर करावा.

यावर प्रभाग अभियंता, यांचा मा.फेरसादर अभिप्राय की, दि.१५/०४/२०१५ चे कार्यारंभ आदेश हे प्राथमिक सोयी सुविधांचा विकास निधी अंतर्गत रु.४०.०० कोटींच्या प्रकल्प अहवालाशी संबंधीत आहे. प्रस्तावित ऑफिस रिपोर्टशी सदर कार्यारंभ आदेशाचा संबंध नाही.

प्रस्तावित ऑफिस रिपोर्टनुसार महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) या योजनेतुन कामे प्रस्तावित करावयाची आहेत. त्यासाठी मा.महासभेकडेस सदर प्रस्ताव निर्णयासाठी सादर करणे आवश्यक आहे.

तरी सदरचा ऑफिस रिपोर्ट मान्यतेस्तव सविनय फेरसादर.

यावर प्र.शहरअभियंता श्री.सोनटक्के यांचा अभिप्राय की, इकडील कार्यारंभ आदेश जा.क्र.साबांवि-०२ दि. १५/०४/२०१५ चा आदेश प्राथमिक सोयी सुविधा अंतर्गत करावयाच्या विकास कामांपुरता मर्यादीत होता. प्रस्तावानुसार रक्कम रु.१००.०० कोटी पर्यंतची विकासकामे प्राधान्यक्रमाने ठरविणे ही बाब धोरणात्क असलेने मा.महासभेची मंजुरी आवश्यक असलेने मा.महासभेपुढे घेणेसाठी सदर प्रस्ताव मा.नगरसचिव यांचेकडे पाठविणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त श्री.विलास वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, उपरोक्त सविस्तर फेरसादर अहवाला प्रमाणे व प्रस्तावाअन्वये धोरणात्मक निर्णयाकरीता मान्यतेस्तव हरकत नाही. मा.महासभेकडे निर्णयाकरीता सादर करणेकामी मान्यतेस्तव.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित विकास कामासाठी जागा उपलब्धते बाबत व इतर MRTP Act DP,DC rufes इत्यादीसाठी नगररचना विभागाचा उचित अभिप्राय घेवून प्राधान्यक्रम व इतर बाबी ठरविणेसाठी मा.महासभेकडे प्रस्ताव पाठविणे उचित होईल.

यावर मा.महापौर साहेब, यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

**चर्चा :-**

**शहर अभियंता :-** मा.शासनाकडे सन २०१६-२०१७ साठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) अंतर्गत १०० कोटीचा प्रोग्राम पाठवावयाचा आहे. यामध्ये महानगरपालिकेचा ३० % हिस्सा राहणार आहे पूर्वी हा हिस्सा ५०% होता. प्राधान्याने यादी फायनल करायची आहे. पकल्पाच्या कामावरील देखभालीसाठी प्रकल्प सल्लागार संस्था नेमावयाची आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** पूर्वी हा ठराव घेतला होता आता ७०% मा. शासनाचा हिस्सा राहणार आहे. यातील कामांना प्राधान्यक्रम द्यायचा आहे. डी.पी.रस्ते घ्या सर्व सन्माननीय सदस्यांना विचारात घेवून कार्यवाही करा. कुठल्या पक्षाचे महापौर नाही. विरोधक सत्ताधारी सर्वांचा यामध्ये समावेश करुन दळणवळणाचा विचार करुन रस्ते प्रस्तावीत करा. कुठेतरी कन्स्ट्रक्टीव्ह  कामे करा शहराचा चेहरामोहरा बदलला पाहीजे प्राधान्यक्रम देण्यासाठी महापौरांना महासभेच्या वतीने पूर्ण अधिकार देण्यांत यावेत.

**मा.श्री.सचिन जाधव :-** चर्चा होवू द्या. यादी वाचुन दाखवा सदस्य सूचवतील ती कामे घ्या.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** जास्तीचा प्रस्ताव पाठवा. २० मीटर पुढचे रस्ते उपनगराकडे वळवणे गरजेचे असतील. जास्त निधी केडगांव, शिवाजीनगर कल्याणरोड, सावेडी उपनगर या भागातील रस्ते करणेसाठी घेण्यात यावेत.

मा.सौ.मनिषा बारस्कर यांनी निवेदन दिले.

**मा.श्री.संजय घुले** :- हुडको करीता जे कर्ज  घ्यायचे त्याकरीता कमिटी स्थापन करण्याचे मागील सभेत ठरले. त्या कमिटीचे काय झाले कोणत्या प्रॉपर्टी घ्यायच्या.

**मा.श्री.श्रीपाद छिंदम** :- कमिटी प्रलंबित आहे.

**मा.श्री.अभिषेक कळमकर** :- हुडकोचे ३० कोटीचा विषय यात टाकला कसा.

**प्रकल्प अभियंता श्री.निंबाळकर** :- डी.पी.रस्त्याची यादी वाचुन दाखविली.

**मा.श्री.विजय गव्हाळे** :- मल्हार चौक ते रेल्वेस्टेशन डी.पी.रस्ता आहे का ?

**प्रकल्प अभियंता श्री.निंबाळकर** :- डी.पी.रस्ता आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे** :- हा रस्ता यादीत घेण्यात यावा.

**मा.महापौर साहेब** :- मा.सदस्यांनी सुचविलेली कामे यादीत समाविष्ठ करण्यांत यावीत.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब** :- जे काही ३१६ रोड आहेत त्यापैकी कीती जागा ताब्यात आहे.

हे डी.पी.निश्चीत करुन घ्यावे. व शहर अभियंता यांनी यापूर्वी केंव्हा काम झाले व गॅरंटी केंव्हा संपली याबाबत खात्री करुन प्रस्ताव तयार करण्यास प्राधान्यक्रम आपण ठरवू.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब** :- ३० कोटी महानगरपालिकेचा हिस्सा मा.शासनाकडुन जर नगरोत्थान योजने अंतर्गत जो निधी येईल त्याच्या साठी महानगरपालिका हिस्सा आहे.

**मा.महापौर साहेब** :- ऑफिस रिपोर्ट व सभेत झालेल्या चर्चेनुसार विषय मंजूर करण्यांत येत आहे. तसेच या योजनेमधील कामांना प्राधान्यक्रम ठरविणे बाबत मा.महापौरांना अधिकार देण्यांत येत आहे.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व सभेत झालेल्या चर्चेनूसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) अंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल प्रकल्प सल्लागार संस्थेमार्फत मा.शासनाकडेस मान्यतेसाठी सादर करणेत यावा. तसेच सदर कामांचे देखभालीसाठी प्रकल्प सल्लागार संस्थेची नेमणूक करणेबाबत कार्यवाही करावी. तसेच याकामासाठी मनपा हिस्स्यापोटी भरावयाची रक्कमेकरिता कर्ज उभारणी कामी मा.शासनाची मान्यता घेण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. सदर योजनेच्या मनपाच्या हिश्यापोटी भरावी लागणारी रकमेचे कर्ज हुडको किंवा इतर वित्तीय संस्थांकडून घेणेस तसेच या कर्जापोटी तारण ठेवावयाच्या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांची निश्चिती यापुर्वी नेमण्यांत आलेल्या मा.सदस्यांच्या कमिटीकडून करण्यांत यावी. या योजनेअंतर्गत कामांचे प्राधान्यक्रम सुचविण्याचा अधिकार मा.महापौर यांना देण्यात येत आहे. यांस ही सभा मान्यता देत आहे.

याबाबत नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**सुचक** :- मा.श्री.अनिल माधवराव शिंदे

**अनुमोदक :-** मा.श्री.दिलीप नानाभाउ सातपुते

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**चर्चा :-**

मा.श्री.कैलास गिरवले :- परवाच्या दिवशी धार्मिक स्थळावर कारवाई केली १९ तारखेला मंदिर वाचवण्याची तुमची बातमी येते व त्याच दिवशी कारवाई केली गेली. प्रशासनाने विश्वासात आपणाला घेते की नाही हे दिसते. निदान याची आपणाला कल्पना होती किंवा नाही याबाबत माहिती द्यावी. संबंधीत नगरसेवकांना कळवायला पाहीजे होते. कोण कारणीभुत आहे याला. इथुन पुढच्या कालखंडात काय धोरण राहणार आहे.

मा.श्री.सुनिल कोतकर :- स्थायी समिती सभापतींनी १ रुपया नाममात्र घेवून रेग्युलराईज करणार असे मांडले होते.

अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :- ही जी कारवाई करण्यात आली दि.०१/१०/२०१६ रोजीच्या आदेशानुसार करण्यात आली. वर्तमानपत्रात वेळोवेळी प्रसिध्दी देवून सुनावणी घेवून पुरावे सादर करण्याची संधी देवून कारवाई केले आहे.

मा.श्री. कैलास गिरवले :- महापौरांना या गोष्टीची कल्पना दिली होती का ?

अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :- सदरची कारवाई करण्यापूर्वी पोलीस महसुल प्रशासन व महानगरपालिका स्तरावर चर्चा करुन कायदा सुव्यवस्था शांतता सुव्यवस्थीत राहण्याचे दृष्टीने गोपनीय कारवाई केली.

मा.श्री.कैलास गिरवले :- आयुक्त साहेब तुम्ही खुलासा द्या.

मा.श्री.दिप चव्हाण :- आपणाला कळविले असेल तर तसे सांगा विषय संपवून टाका

मा.महापौर साहेब :- प्रशासनाने मला कळविले होते त्यांना काहीच पुरावे मिळाले नाही २००९ नंतरच्या मंदिराच्या बाबतीत १ रुपया नाममात्र घेवून कारवाई करणार आहोत. खाजगी किंवा ओपन स्पेस मधल्या मंदिरावर कारवाई करण्यापूर्वी जे वाचवता येईत ते वाचवणार जे नियमात बसत नसेल त्यावर कारवाई होणार ही बातमी फक्त आपल्या नगर शहरापुरती नाही.

मा.श्री.कैलास गिरवले :- आपण सांगता त्याची अंमलबजावणी होत नसेल तर याच्या सारखे दुर्देव नाही.

मा.महापौर साहेब :- पुढील विषय वाचा ज्या विषयासाठी सभा बोलविण्यात आली त्यावर अगोदर चर्चा होवू द्या त्यानंतर इतर चर्चा होईल.

मा.श्री.अनिल शिंदे :- मंदीराची कल्पना दिली हे तुम्ही आता सांगीतले. तुम्हाला आता आयुक्तांनी कल्पना दिली. धार्मिक प्रश्न आहे सर्वांना बोलू द्या. यासंदर्भात बरेचसे आंदोलने झाली. बराचसा वेळ झालेला आहे. अजेंडयावरील विषय घ्या. सन्माननीय सदस्यांना यावर चर्चा करु द्या. अजेंडयावर विषय घ्या.

मा.महापौर साहेब :- त्या विषयावर चर्चा होणार आहे. पण विषय झाल्यानंतर चर्चा होईल. अगोदर गिरवले साहेब बोलतील.

मा.श्री.कैलास गिरवले :- निदान तुम्हाला एकटयाला जरी कळविले असते तर आम्ही समजू शकतो या शहराचे प्रथम नागरीक म्हणून आपणास कल्पना देणे आवश्यक होते ते केले नाही. यापुढच्या कालखंडात १०५ धार्मिक स्थळांवर कारवाई करणार अनेक मंदिर मस्जिद आहेत. अनेक जुनी मंदीरे आहेत त्यांना बेकायदेशीर ठरवले आहे उदा- म्हसोबा खंडोबा भैरोबा हे मंदीरे जसे गांव वसते तशी उभी राहतात.

कर्मचारी सभागृहात येतो त्यावर कारवाई का करीत नाही अशी जर प्रथा पडली तर सभागृहात कोणीही येईल. याबाबत आपण काय कारवाई करणार मा.महापौर-मा.आयुक्त साहेब संबंधीत कर्मचा-याची भेट घेतील. अशी सुध्दा मंदिर बेकायदेशीर ठरवून पाडणार आहात. अनेक मंदिर १०० वर्षापुर्वीची आहे. या शहराला ५०० वर्षापूर्वीचा इतिहास आहे. डी.पी. नावाचा प्रकार आहे की नाही. तुम्हाला मंदीर मस्जीद अडथळा दिसते. लोकांनी जागा अडवून रस्ता अरुंद केला. रस्ते रुंद करा याबाबत काही धोरण घेणार की नाही. रस्त्यात खरच अडथळा येत असेल ते आम्ही काढुन द्यायला तयार आहोत. त्या ठिकाणी रस्ते वायडींग करायला सोय आहे अशा ठिकाणी रस्ते रुंद करा. यात तुमच्या गल्लीतील मुंजोबा मंदिर आले आहे. तेथे तुम्ही कसा करता. ज्याला पर्यायी व्यवस्था करता येईल दोन्ही बाजुने रस्ते वायडींग करा. सन्माननीय महापौर यांना कल्पना द्यायला पाहीजे होती. प्रशासनाने या शहराचे प्रथम नागरीक म्हणून सांगायला पाहीजे इथुन पुढे निदान महापौरांना सांगावे. वेळ पडल्यास रस्त्याची रुंदीकरण करा. ज्याला जुना पुरातन इतिहास आहे याबाबत विचार करावा.

मा.श्री.संपत बारस्कर :- कारवाईची कल्पना कोणालाच दिली नव्हती १९ तारखेला ३ नंबर वॉर्डात आपण सार्वजनिक कार्यक्रमात आपण मंदिर वाचवणार असे स्टेटमेट दिले. धार्मिक स्थळ वाचवणे हे कर्तव्य आहे. नाममात्र दंड करुन धार्मिक स्थळे नियमीत करण्यात येतील असे रुलिंग आपण मागील सभेत दिले आहे.

मा.महापौर साहेब :- खाजगी जागेतील सार्वजनिक धार्मिक स्थळांना १ रुपया नाममात्र देवून निश्चीत करु असे सांगीतले. तसे करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

मा.श्री.संपत बारस्कर :- धार्मिक स्थळांच्या बाबतीत मंत्र्यांचा उपयोग करुन धेणार की नाही. आपली सत्ता आहे. बोल्हेगांव म्हसोबा ओटा तोडला, मारुती मंदिर पाडले.

मा.महापौर साहेब :- प्रयत्न करणार आहे.

मा.श्रीमती.दिपाली बारस्कर :- तुम्हाला माहिती आहे ते मंदिर कसे झाले.

मा.श्री.संपत बारस्कर :- कारवाई झाली याची पूर्व कल्पना तुम्हाला दिली होती का ?

मा.महापौर साहेब :- कारवाई कशी झाली याचा खुलासा द्यायला सांगते.

अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :- सदरची कारवाई मा.सुप्रीम कोर्ट व उच्च न्यायालयाचे आदेशानुसार करण्यात आले. हनुमान मंदीर शासन निर्णय परिपत्रक व मा.न्यायालयाने ज्या सूचना दिल्या कायदेशीर बाबीचे काटेकोरपणे पालन करुन पदाधिकारी यांच्या वेळोवेळी बैठका घेवून वेळोवेळी पोलीस अधिकारी, मा.जिल्हाधिकारी यांचेशी चर्चा करुन मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये आहेत. सप्टेंबर २००९ पुर्वीचे मा.न्यायालयाचे धार्मिक स्थळावर ३१ डिसेंबर २०१६ पूर्वी कारवाई करणेबाबत आदेश आहेत. सर्व कायदेशीर तरतुदीचे पालन करण्यात आले. मा.महापौर यांना कल्पना देण्यात आलेली आहे.

मा.श्री.अनिल शिंदे :- कल्पना दिलेली नव्हती. आयुक्त तुमच्या कानात बोलले व तुम्ही सांगीतले आजिबात कल्पना दिलेली नाही.

मा.महापौर साहेब :- त्यांनी फोन केला होता कारवाई करण्यापूर्वी केला होता की कारवाई झाल्यानंतर केला.

अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :- महापौर मॅडम अगोदर कल्पना दिली.

मा.श्री.सुवेंद्र गांधी :- कारवाई नंतर फोन झाला.

मा.श्री.संपत बारस्कर :- कारवाईत तुम्ही होता. तुम्ही सांगा आपल्याला याची पूर्व कल्पना नसेल तर तुमचा प्रशासनावर वचक राहीला नाही.

मा.महापौर साहेब :- यानंतर प्रशासनावर कारवाईचा वचक दिसेल.

मा.श्री.दिप चव्हाण :- शेख फारुक रहेमान यांच्या पत्नी डायलेसीसवर आहेत. ते सेवानिवृत्त आहेत. ६ व्या वेतन आयोगाच्या फरकाची मागणी करतात. एखाद्याला ६ व्या वेतन आयोगाचा फरक द्या.

मा.महापौर साहेब :- प्रशासनाला तसे आदेश देवू.

मा.श्री.दिप चव्हाण :- त्याचे पेपर्स मागवा ग्रॅज्युएटी देत नाही. फंड देत नाही. मग त्याने कोणता मार्ग स्विकारावा. कर्मचा-यांचे देणे बाकी आहे असे जे काही प्रश्न आहेत कॅफो साहेब तुम्ही देणार का ते सांगा.

मा.श्री.कैलास गिरवले :- असा प्रश्न अनेक कर्मचा-यांचा आहे आज एक आला उद्या दुसरा येणार याबाबत काय धोरण ठरवणार ते सांगा.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- अशा केसेस मध्ये विशेष मंजुरी घेवू त्या रक्कमेसाठी जो सक्षम प्राधिकारी आहे त्यांची मंजूरी घेवून कार्यवाही करण्यांत येईल.

मा.श्री.कैलास गिरवले :- कोण अधिकारी आहे. अधिका-याला वेळ नाही का. उद्या एखाद्याने आत्मदहन केले तर कोण जबाबदार. आयुक्त साहेब मुगगिळल्या सारखे बसू नका. धोरणात्मक निर्णय घ्या.

उपायुक्त (सा) श्री.चारठाणकर :- असे अनेक कर्मचारी आहेत. रक्कम अदा करण्यासाठी २४ हप्ते केले आहेत. ३ हप्ते दिले. ४ व ५ प्रलंबित आहे. अशा प्रकरणांचा ८ दिवसात एकत्रित आढावा घेवून त्यांना रक्कम देण्याची व्यवस्था करु.

प्रति,
पोलीस निरीक्षक,
तोफखाना पोलिस स्टेशन,
अहमदनगर.

विषय : गुरुवार दिनांक २२/१२/२०१६ रोजी दुपारी १.०० वा होणा-या अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेसाठी पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत...

महोदय,

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, गुरुवार दिनांक २२/१२/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी सदर दिवशी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन अहमदनगर महानगरपालिका सभागृहास पुरेसा पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत विनंती आहे.

सहाय्यक आयुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.पोलीस अधिक्षक, पोलिस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.
जा.क्र.नगरसचिव/AMC.-
दिनांक :      /१२/२०१६.

संबंधीत खाते प्रमुख व शाखा प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस.-

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक २२/१२/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपल्या नावासमोर दर्शविलेल्या कामाची आपण पुर्तता करावी.

सहाय्यक आयुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | शहर अभियंता | : | या सभेकरीता स्टेजवरील व्यवस्थेसह हॉलमधील मा.नगरसेवकांच्या संख्येनुसार तसेच विभाग प्रमुख, पत्रकार व नागरिक यांच्या संख्येनुसार सभागृहातील बैठक व्यवस्था पाहुन ज्या सोयी सुविधा सभेसाठी आवश्यक असतील त्या कराव्यात |
| २) | घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख | : | महानगरपालिका सभागृहाचे आसपासचे भागाची साफसफाई करुन घेण्याबाबत संबंधितांस सुचना द्याव्यात. |
| ३) | प्रसिध्दी अधिकारी | : | बैठकीची सुचना व विषयपत्रिका या सोबत जोडली आहे. त्याची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रात त्वरीत प्रसिध्द करावी व प्रसिध्दीचे २ (दोन) अंक इकडेस पाठवावेत. |
| ४) | इलेक्ट्रीक सुपरवायझर | : | वरीलप्रमाणे नोंद घेवून महानगरपालिका सभागृहातील सभेकरीता लाईट व लाऊड स्पीकरची व्यवस्था करण्यात यावी. तसेच नेहमीप्रमाणे टेपरेकॉर्डची सुध्दा व्यवस्था करण्यात यावी. |
| ५) | श्री.राजेंद्र गायकवाड, घनकचरा विभाग | : | महानगरपालिका सभागृहात सभेपुर्वी उपस्थित राहुन सभेच्या वेळेस विषय वाचन करावे. |
| ६) | श्री.दत्तात्रय ढवळे, स्वीय सहा. आयुक्त कार्यालय, | : | आपण सभेपुर्वी महानगरपालिका सभागृहात उपस्थित राहुन संपुर्ण सभेचे प्रोसिडींग घेण्याचे काम करावे. |
| ७) | श्री.अशोक चेन्नुर, पाणीपुरवठा विभाग | : | महानगरपालिका सभागृहात राष्ट्रगीत म्हणणे करीता सभेपुर्वी उपस्थित रहावे. |
| ८) | मनपा हवालदार | : | वरील प्रमाणे नोंद घेवुन महानगरपालिका सभागृहात आवश्यक ती पुर्तता करावी. |

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

कार्यालयीन आदेश.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
जा.क्र.नगरसचिव.AMC.-
दिनांक : / १२ /२०१६.

१) श्री.शंकर बहिरवाडे, उपायुक्त कार्यालय,
२) श्री.महेश तांबे, उपमहापौर कार्यालय,
३) श्री.संजय डहाळे, सभागृह नेता कार्यालय,

४) श्री.मच्छिंद्र शिंदे, नगरसचिव विभाग,
५) श्री.सुरेश भुतकर, ऑडीट विभाग,
६) श्री.गणेश वरुटे, सामान्य प्रशासन विभाग,
७) श्री.प्रसाद भालेराव, सामान्य प्रशासन विभाग,
८) श्री. राहुल शिंदे, कामगार विभाग,
९) श्री.रविंद्र जपे, बांधकाम विभाग
१०) श्री.संतोष कांबळे, घनकचरा व्यवस्थापन विभाग
अहमदनगर महानगरपालिका.

यांस.-

आदेशीत करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक २२/१२/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी आपण सकाळी १०.०० वाजता कार्यालयीन गणवेशात हजर रहावे व मनपा हवालदार यांच्या सूचनेनुसार काम पहावे.

सहाय्यक आयुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : महानगरपालिका हवालदार, अहमदनगर महानगरपालिका यांस माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
नगरसचिव विभाग.-
दिनांक : /१२/२०१६.

विषय : गुरुवार दिनांक २२/१२/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता झालेल्या मा.सर्व साधारण सभा क्रमांक ७ च्या चहापान खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत...

सादर,

विनंती रिपोर्ट की, महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्रमांक एम.सी.ओ. ४६८५-१८८२ सी. आर.६८-८६-युडी-१४ दिनांक २९ जुलै १९८६ अन्वये कळविले आहे की, चहा व इतर पदार्थांचे दर बदलत असतात म्हणून चहापानाचे कमाल दर परिपत्रकान्वये ठरवून देण्याची आवश्यकता वाटत नाही. कौन्सीलच्या सांविधीक समितीच्या बैठकीसाठी मनपा/नपा यांनी चहापानाचा खर्च आकस्मिक निधीतून (कॉन्टीजन्सी एक्सपेंन्डीचर) किती करावा हे प्रत्येक नगरपालिकेने ठरवावे त्याप्रमाणे खर्च करावा, अशी तरतूद आहे.

अहमदनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभा क्र. १ दिनांक १७/०२/२०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिका खास सभा/सर्वसाधारण सभेचा चहापान खर्च रक्कम रु. १८,०००/- करणेत आला आहे. अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक २२/१२/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह, अहमदनगर येथे झाली आहे.

सदर अहमदनगर महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित केलेल्या या सभेस उपस्थित सभासदांचे चहापानाकरीता रक्कम रु.१३,८२०/- (अक्षरी रक्कम रुपये तेरा हजार आठशे वीस फक्त) च्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळावी, सदरचा खर्च नगरसचिव विभागाच्या *** सभेचे चहा नाष्टा बील *** या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविण्याच्या मान्यतेस्तव तसेच सदरचा खर्च प्र.नगरसचिव, अहमदनगर महानगरपालिका यांनी केला असुन सदरचा धनादेश प्र.नगरसचिव, अहमदनगर महानगरपालिका यांचे नांवे काढणे बाबत मुख्यलेखाधिकारी यांना आपलेस्तरावरुन आदेश होणेस विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| **तरतुद** | **:** | **४,००,०००/-** |
| **पुर्वीचा खर्च** | **:** | |
| **हया बीलात दाखविलेला खर्च** | **:** | |
| **उपलब्ध शिल्लक** | **:** | |

प्र.नगरसचिव,
नगरसचिव विभाग,
अहमदनगर महानगरपालिका.

**सभा सुचना क्रमांक ०७,   गुरुवार  दिनांक  २२ / १२ /२०१६ रोजीचा**

**सर्वसाधारण सभेचा अजेंडा वाटप करण्यास मिळाले बाबत स्वाक्षरी.**

| **पान क्रमांक** | **नांव** | **स्वाक्षरी** |
|---|---|---|
| १ | श्री.-------------------------- | |
| २ | श्री.-------------------------- | |
| ३ | श्री.किरण क्षिरसागर | |
| ४ | श्री.-------------------------- | |